रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २२८ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

**पाहिजेत**

संस्थेअंतर्गत असणाऱ्या शासकीय / अशासकीय अनुदानातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पामधून अकाउंटंट असिस्टंट, प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प असिस्टंट, कौन्सिलर, जनसंपर्क प्रमुख इत्यादी विविध पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवार पदवीधर BSW, MSW, B.Com, MBA अहर्ता प्राप्त असावा. अनुभवींनी अपेक्षित मानधनासह ही जाहिरात प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसात अर्ज करावेत. सदर पदे तालुकास्तरावर, जिल्हा स्तरावर व गाव पातळीवर असून ही पदे रायगड, ठाणे जिल्ह्यातून भरावयाचे आहेत. अर्ज खालील ई-मेलवर करावेत.msvtrecrutment.com, msvt.in

रायगड, शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## हिमाचलमध्ये जोरदार बर्फवृष्टी

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशातील उंच डोंगराळ भागात जोरदार बर्फवृष्टी सुरू झाली आहे. पर्यटक हिमवृष्टीचा आनंद घेत आहेत. तर हिमाचलच्या तीन जिल्ह्यांमध्ये मुसळधार हिमवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंबा, कुल्लू आणि लाहौल-स्पिती या जिल्ह्यांमध्ये अलर्ट जारी केला आहे. राज्यात तीव्र पश्चिमी हिमवातामुळे, उंच आणि मध्यम उंचीच्या भागात दिवसभर हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे, तर खालच्या आणि मैदानी भागात पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.

## वे|ध|क

### मुलीवर सामूहिक अत्याचार

**जळगाव :** जिल्ह्यातील पाचोरा येथे अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाचोरा पोलिसांनी तीन जणांविरुद्ध पोस्को कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. तिसरा आरोपी फरार आहे. मे ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तसेच संशयित आरोपींनी फोटो काढून ते व्हायरल करण्याच्या धमक्या देत पीडितेवर अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्यानंतर पीडितेने पालकांकडे हा प्रकार सांगितला होता. त्यानंतर हा प्रकार उघड झाला आहे. आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### भुजबळांना दिलासा

**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यावर टांगती तलवार असलेल्या कथित महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते छगन भुजबळ मोठा दिलासा दिला आहे. आधी एसीबी आणि आता ईडी, अशा दोन्ही यंत्रणांकडून भुजबळ आता पूर्णपणे निर्दोष मुक्त झाले आहेत. दिल्लीतील महाराष्ट्र सदन बांधकामात तब्बल ८५० कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचा गंभीर आरोप छगन भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात भुजबळांना दोन वर्षे तुरुंगातही राहावे लागले होते. त्यांच्यासह एकूण १४ जणांची नावे या कथित घोटाळ्यात गुंतलेली होती. मात्र, आता त्यांच्यावरील सर्व आरोपांना पूर्णविराम मिळाला आहे.

## मंत्री भरत गोगावलेंचा ‘विकास’ गजाआड



- महाडचा राडा अखेर भोवला
- फरार आरोपी पोलिसांना शरण
- न्यायालयाकडून दोन दिवसांची पोलीस कोठडी



**। महाड । प्रतिनिधी ।**

**महाडमधील गाजलेल्या राडा प्रकरणात गेल्या ५० दिवसांपासून फरार असलेला राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावलेंचा मुलगा विकास गोगावले पोलिसांना शरण आला. विकास गोगावले याच्यासह अन्य सात आरोपींसह राष्ट्रवादी काँग्रेस गटातील आरोपींनीही शुक्रवारी महाड पोलीस ठाण्यात हजर होत न्यायालयाच्या आदेशानुसार आत्मसमर्पण केलं. त्यानंतर विकास गोगावलेसह अन्य आरोपींची जवळपास सहा तास कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर सर्व आरोपींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.**

दरम्यान, शिवसेना शिंदे गटातील आरोपींच्या आत्मसमर्पणानंतर सुमारे पाच तासांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संशयित आरोपींनीही महाड तालुका पोलीस ठाण्यात हजर होत समर्पण केलं. या राडा प्रकरणात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांविरोधात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून हनुमंत जगताप, जगदीश पवार, निलेश महाडिक, धनंजय देशमुख आणि श्रेयस जगताप यांनी पोलीस ठाण्यात हजर होत आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली. सर्व आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने जामीन नाकारत पोलिसांना फटकारल्यानंतर अखेर दोन्ही बाजूंच्या आरोपींनी समर्पण केलं. या संपूर्ण प्रकरणात केवळ एका बाजूवरच कारवाई का होत आहे, असा थेट सवाल उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना चांगलाच फटकारा दिला होता. परस्पर विरोधी गुन्हे दाखल असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या आरोपींनाही अटक करण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले होते. राष्ट्रवादीकडून हनुमंत नाना जगताप, संदीप जाबरे, निलेश महाडिक, श्रीयश जगताप आणि धनंजय देशमुख यांच्याविरोधातही कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. अखेर न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर दोन्ही बाजूंच्या आरोपींनी आत्मसमर्पण केल्याने तपासाला वेग येण्याची शक्यता आहे.

**काय आहे प्रकरण?**

नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. २ डिसेंबर २०२५ रोजी महाडमध्ये मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक दोनमध्ये मोठा राडा झाला होता. यावेळी शिंदेसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते. या राड्यादरम्यान विकास गोगावले यांच्यावर अजित पवार गटाच्या सुशांत जाबरे यांच्या बॉडीगार्डने रिव्हॉल्व्हर रोखल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला होता. या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले होते.

**न्यायालयानं फटकारलं**

दरम्यान, राज्यातील महायुती सरकारमधील कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या मुलाच्या अटकपूर्व जामिनाच्या मुद्द्यावरून २२ जानेवारी रोजी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला जोरदार फटकारलं होतं. “मुख्यमंत्री इतके हतबल कसे? मंत्र्यांची मुलं गुन्हे करून मोकाट फिरतात, तरी पोलिसांना सापडत नाहीत? या राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे की नाही?” असे थेट सवाल करत न्यायमूर्ती माधव जामदार यांनी सरकारला चपराक लगावली होती. यानंतर शुक्रवारी सकाळी विकास गोगावले महाड शहर पोलीस ठाण्यात हजर झाला.

> महाड शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन गुन्ह्यांपैकी एका गुन्ह्यातील आठ आरोपींनी आत्मसमर्पण केले आहे. आरोपींची चौकशी सुरू असून, पुढील तपास चालू आहे.
>
> – शंकर काळे, पोलीस उपअधीक्षक, महाड

## बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण
# नराधमाला पोलीस कोठडी





- स्कूल व्हॅन चालकाने व्हॅनमध्येच केला लैंगिक अत्याचार

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बदलापूर शहर पुन्हा एकदा लैंगिक अत्याचाराच्या घटनेमुळं हादरलं आहे. एका खासगी शाळेतील चार वर्षीय चिमुरडीवर स्कूल व्हॅन चालकानं व्हॅनमध्येच लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली. या प्रकरणातील नराधम चालकाला शुक्रवारी (दि. २३) कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी पोलीस बंदोबस्तात तैनात करण्यात आला होता. दरम्यान, पोक्सो विशेष न्यायालयात हजर केले असता २७ जानेवारीपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती पीडितेचे वकील एम. पांडे यांनी दिली.

चिमुकलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर प्रशासन खडबडून जागं झालं आहे. कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयानं संबंधित स्कूल व्हॅनवर कडक कारवाई केली आहे. तपासादरम्यान या स्कूल व्हॅन चालवण्यासाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या गंभीर निष्काळजीपणाची दखल घेत प्रादेशिक परिवहन कार्यालयानं संबंधित व्हॅनचा परवाना रद्द करत स्कूल व्हॅन मालकाला २४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी शाळेत शिकणारी चार वर्षीय चिमुरडी शाळा सुटल्यानंतर खासगी स्कूल व्हॅनमधून आपल्या घरी जात होती. •> पान २ वर

> व्हॅनमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण करताना शिक्षण विभागाच्या आवश्यक नियमावलीचं पालन केलं जात नसल्याचं पालकांचं म्हणणं आहे. या घटनेची माहिती मिळताच काही स्वयंसेवी कार्यकर्ते आणि राजकीय नेत्यांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेतली होती. आज आरोपीला न्यायालयात हजर केलं असता २७ जानेवारीपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे.
>
> – **शैलेश काळे,** पोलीस अधीक्षक

## भरधाव रिक्षाची कंटेनरला धडक; दोघांचा मृत्यू



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेलकडून पेणकडे जाणाऱ्या दिशेने रोडवर विठ्ठल कामत हॉटेलजवळ चिंचवण गाव रस्त्याच्या मध्ये भरधाव जाणाऱ्या रिक्षाने रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या कंटेनरला जोरदार धडक दिली. या धडकेत मुंब्रा येथील दोघांचा मृत्यू झाला असून, दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

महामार्गावर चिंचवण गावाजवळ कंटेनर (एमएच ४६ बीएम ३४५५) वरील चालक याने रात्रीच्या सुमारास त्याचे ताब्यातील रस्त्याचे मध्ये वाहतुकीस अडथळा होईल असे लावले होते. यादरम्यान येणाऱ्या रिक्षाने या कंटेनरला धडक दिली. या धडकेत रिक्षाचालक रफिक अन्सारी (४०), फातीमा अन्सारी (२०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर शहनाज अन्सारी (४०), सुमया अन्सारी (९) हे गंभीर जखमी झाले आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांनी कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाचा अपघाती मृत्यू

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

अज्ञात वाहनाने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत २५ वर्षीय सुमित सुरेंद्र झा याचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी २१ जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुमित सुदर्शन झा हा उलवे, सेक्टर १६ येथे राहात असून, आठ जानेवारी रोजी होंडा कंपनीची एसपी १२५ मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ सीजे ८७४४ घेऊन तो कामानिमित्ताने बाहेर गेला होता. उलवे पनवेल लेने जात असताना जेएनपीटी रोड जेडब्ल्यू आर कंपनीच्या समोर काळुबाई मंदिराजवळ कुंडेवहाळ या ठिकाणी अज्ञात वाहनाने त्याच्या मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत सुमित झा गंभीर जखमी झाला होते.

## अलिबाग नगरपरिषदेच्या विषय समित्यांच्या सभापतींची निवड



संबंधित छायाचित्र पान ३ वर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर नगराध्यक्षपदाची सूत्रे अक्षया नाईक यांनी स्वीकारली असून, उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी ॲड. मानसी म्हात्रे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यानंतर आता नगरपरिषदेतील विविध विषय समित्यांच्या सभापती व सदस्यांची निवड पूर्ण करण्यात आली आहे.

शुक्रवारी (दि. २३) अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात झालेल्या विशेष बैठकीत स्थायी समितीची स्थापना करण्यात आली. यासोबतच शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने चार प्रमुख विषय समित्यांची रचना करण्यात आली आहे.

स्थायी समितीच्या पदसिद्ध सभापतीपदी नगराध्यक्षा अक्षया नाईक आणि •> पान २ वर

## ‘महाराष्ट्रात माणसांचे लिलाव सुरू’

**मुंबई :** महाराष्ट्रात आज माणसांचे लिलाव सुरू आहे, राजकारणातील स्थिती बघून बाळासाहेब व्यथित झाले असते, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले आहेत. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष २३ जानेवारी, २०२६ पासून सुरु झालं असून, यानिमित्त माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते. याच कार्यक्रमात राज ठाकरेंनी रोखठोक मत व्यक्त केले.

## स्व. प्रभाकर पाटील यांना अभिवादन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गरीबांचे कैवारी, शेतकरी व कामगारांचे नेते, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांची शुक्रवारी (दि.२३) रोजी अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी जयंती साजरी करण्यात आली. स्व. प्रभाकर पाटील यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भाऊ तथा प्रभाकर पाटील यांच्या कार्याची माहिती देऊन त्यांच्या जुन्या आठवणींना अनेकांनी उजाळा दिला.

अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात प्रभाकर पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.



रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ व स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचच्या वतीने प्रभाकर पाटील यांची अलिबागमध्ये जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचचे अध्यक्ष सखाराम पवार यांच्या हस्ते प्रभाकर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी, ज्येष्ठ नाट्यकर्मी शरद कोरडे, आर.सी. घरत, नंदू थळकर, कवी विनोद टेंबूलकर, प्रभाकर पाटील वाचनालयातील कर्मचारी झेबा कुरेशी आदी मान्यवर, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी नागेश कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवरांनी स्व. प्रभाकर पाटील •> पान २ वर

### खरेदी, खाद्यसंस्कृती आणि मनोरंजनाची पर्वणी | नगराध्यक्ष अक्षया नाईक यांची उपस्थिती

## अलिबागमध्ये लायन्स महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरात पुन्हा एकदा उत्साह, आनंद आणि चैतन्याची लाट उसळली आहे. स्थानिक नागरिकांना एकाच छताखाली विविध वस्तूंची खरेदी, चटकदार खाद्यपदार्थ आणि भरगच्च मनोरंजनाचा अनुभव मिळावा, यासाठी लायन्स क्लब अलिबागच्या वतीने भव्यदिव्य अशा लायन्स महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा पाच दिवसीय महोत्सव सोमवार, दि. २७ जानेवारीपर्यंत अलिबागमध्ये रंगणार आहे.

या महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ शुक्रवारी (दि. २३)



(छायाचित्र : समीर मालोदे)

सायंकाळी मोठ्या जल्लोषात पार पडला. यावेळी अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी लायन्स इंटरनॅशनल डायरेक्टर पंकज मेहता, नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, नगरसेवक प्रदीप नाईक, भगवान मालपाणी, प्रवीण सरनाईक, अनिल म्हात्रे, महेंद्र पाटील, संतोष पाटील, नयन कवळे, रमेश धनावडे तसेच लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या आगमनावेळी ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी विविध स्टॉल्सची पाहणी केली. ग्राहकांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या वस्तू आणि खाद्यपदार्थांची सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

या महोत्सवामध्ये पावणेदोनशेहून अधिक स्टॉल्स ग्राहकांच्या सेवेत उपलब्ध असून, विविध प्रकारच्या वस्तूंसह चवदार व्हेज आणि नॉनव्हेज खाद्यपदार्थांचे स्टॉल्स खवय्यांसाठी आकर्षण ठरत आहेत. सायंकाळपासूनच •> पान २ वर

## विमानतळ प्रकल्पबाधितांचे उपोषण स्थगित

- सिडकोकडून मागण्या मान्य झाल्याची माहिती
- मागण्यांबाबत संचालकांच्या दालनात चर्चा



**। उरण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांचे गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण सिडकोचे सह-व्यवस्थापकीय संचालक श्री. गोयल यांच्या दालनात झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर स्थगित करण्यात आले आहे.

या चर्चेदरम्यान प्रकल्पबाधितांच्या अनेक मागण्या सिडकोने मान्य केल्या आहेत. त्यामध्ये घरभाडे भत्ता तसेच प्रोत्साहन भत्ता देण्यास सिडकोने सहमती दर्शवली आहे. मात्र, यासाठी संबंधित गावांतील घरांच्या तोडकामाची निश्चित तारीख ठरवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच शून्य पात्रता अथवा नाकारलेल्या घरांबाबत सबळ पुरावे सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

याशिवाय प्रकल्पबाधितांच्या मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे. विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या मुलांनी नावनोंदणी करून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, अशी व्यवस्था सिडकोमार्फत करण्यात आली आहे. या मागण्या मान्य झाल्याने सदर आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.•> पान २ वर

# विषय समित्यांची बिनविरोध निवड


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड-जंजिरा नगरपालिकेच्या सभागृहात पिठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या अध्यक्षतेखाली विषय समित्यांच्या निवडीसाठी विशेष सभा पार पडली. सभेच्या सुरुवातीला सदस्यांचे स्वागत करून सभेच्या नोटीसचे वाचन करण्यात आले. यावेळी विषय समित्यांची संख्या किती असावी, यावर चर्चा झाली.

शिंदे शिवसेना पक्षाचे गटनेते पांडुरंग आरेकर यांनी अध्यक्षांसह सहा समित्या असाव्यात, अशी मागणी केली. तर सत्ताधारी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक तमीम ढाकम यांनी चार समित्यांचा प्रस्ताव मांडला. संख्याबळ लक्षात घेता निवडणूक न घेता तडजोडीने अध्यक्षांसह पाच विषय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर पाचही विषय समित्यांवरील सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या सभेला नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, प्रकाश आरेकर, सुदेश माळी, सतीश जंजिरकर, निलेश शेंडगे, शिंदे, पांढरे मॅडम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**स्थायी समिती**

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर यांची स्थायी समितीच्या अध्यक्षा म्हणून बिनविरोध निवड झाली.

आरोग्य व शिक्षण समिती : सभापती : विरेंद्र दत्तात्रेय भगत, सदस्य : अंकिता दिपेश गुरव, ॲड. रुपेश शंकर पाटील, आदेश हरिश्चंद्र दांडेकर, तमीम ढाकम.

बांधकाम व दिवाबत्ती समिती : सभापती : यास्मिन जाहिद कादिरी, सदस्य : ॲड. रुपेश शंकर पाटील, नितिन नामदेव, आंबुर्ले, आदेश हरिश्चंद्र दांडेकर, मनोज हरिश्चंद्र भगत.

पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती : सभापती : पांडुरंग कृष्णा आरेकर, सदस्य : मनीष मोहन विरकुड, विजय शंकर पाटील, रुपेश रमेश पाटील, प्रीती प्रविण चौलकर.

नियोजन व पर्यटन विकास समिती : सभापती : रुपेश रविंद्र रणदिवे, सदस्य : वैदेही प्रकाश आरेकर, श्रीकांत नारायण खोत, श्रद्धा चंद्रकांत अपराध, प्रमिला सुभाष माळी.

महिला व बालकल्याण समिती : सभापती : नगमाना इम्तियाज खानजादे, उपसभापती : सुगंधा पांडुरंग मकु, सदस्य : अंकिता दिपेश गुरव, देवयानी देवेंद्र गुरव, प्रांजली चेतन मकु.

## दोन लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल :** जुन्या मशीन पावडर कोटिंग करून देतो असे सांगून दोन लाख ३४ हजार रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारून नवीन आणि कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूकप्रकरणी आरोपी प्रशोध पाणीकर आणि यामिनी पाणीकर (रा. एनआरआय कॉम्प्लेक्स, सिवूड) यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. अल्ताफ पठाण हे खारघर सेक्टर ४० येथे राहात असून, ते नवीन जिमच्या साहित्याच्या शोधात होते. प्रशोध पाणीकर यांच्यावर त्यांनी फोनवर बोलणे केले. यावेळी जुन्या पंधरा मशीनपैकी सात मशीन बदलून नवीन देणार आणि उर्वरित आठ मशीन पावडर कोटिंग करून देणार असल्याचे ठरले. यावेळी बिग बॉय फिटनेस नावाची कंपनी असल्याचे खोटे सांगून विश्वास संपादन करुन फसवणूक केली आहे.

## विद्यार्थ्यांकरिता रस्ता सुरक्षाविषयक कार्यशाळा

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

३६ वे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता रस्ता सुरक्षाविषयक कार्यशाळा दि. २२ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता, भारती विद्यापिठ, खारघर येथे संपन्न झाली.

या कार्यक्रमाकरिता विजय सूर्यवंशी विभागीय आयुक्त, कोकण, हार्दिक जोशी (ऊर्फ राणा दादा), प्रसिद्ध सिने अभिनेते, जयंत रमेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल, मोहन अवस्थी, प्राचार्य, भारती विद्यापीठ, खारघर, हरिभाऊ जेजुरकर, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल, निलेश धोटे, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल, विनय मोरे, सारथी सुरक्षा सेवा संस्था, नवी मुंबई, विवेक खाडे, उपाध्यक्ष, आम्ही एकत्र श्रमिक संघटना, पनवेल इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाविद्यालयातील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरद्वारे विनय मोरे, सारथी सुरक्षा सेवा संस्था, नवी मुंबई यांनी रस्ता सुरक्षाविषय सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना पृथ्वीराज काकडे, मो. वा. निरीक्षक यांनी केली. मोहन अवस्थी, प्राचार्य, भारती विद्यापीठ, खारघर यांनी सर्व विर्द्यार्थ्यांना महाविद्यलयाच्या परिसरात व रस्त्यावर वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. मराठी सिने सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते हार्दिक जोशी यांनी मार्गदर्शन केले.



## नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांचा सन्मान

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुडच्या कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट अंतर्गत स्नेहप्रभा महिला मंडळातर्फे श्रीलक्ष्मी नारायण मंदिरात मकर संक्रांतीनिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या हळदीकुंकू कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचा सन्मान करण्यात आला.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी श्रीलक्ष्मी नारायण देवताची मनोभावे पूजा करून दीपा सबनीस यांनी लक्ष्मीची ओटी भरली, तर स्नेहप्रभा महिला मंडळांच्या अध्यक्षा जयश्री प्रधान यांनी प्रास्ताविकात आपले विचार मांडले.

चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज अध्यक्षा नैनिता कर्णिक यांनी समाज करत असलेल्या यशस्वी वाटचालीबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचा माजी समाज अध्यक्ष सुनील कुळकर्णी, चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज अध्यक्षा नैनिता कर्णिक, सचिव संदेश मथुरे, उपाध्यक्ष अशोक सबनीस, स्नेहप्रभा महिला मंडळ अध्यक्षा जयश्री प्रधान, उपाध्यक्षा सुचिता पोतनीस, सचिव साक्षी नागले, खजिनदार सुषमा पोतनीस, सुप्रीया मथुरे यांच्या हस्ते श्रीफळ, भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विनय रा.मथुरे, विनय सो. मथुरे, राजेंद्र पोतनीस, सुप्रिया मथुरे, नयन कर्णिक, अरुणा चित्रे, प्रतिभा मोहिले, कल्पना मथुरे, मुग्धा दांडेकर, कविता वाणी उपस्थित होत्या.

## महिला बेपत्ता

| पनवेल | प्रतिनिधी |

नेरे येथील शिल आश्रम येथून आश्रमातील कर्मचाऱ्यांची नजर चुकवून एक ५० वर्षीय मनोरुग्ण महिला बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. सारा असे या महिलेचे नाव असून (५०) ती अंगाने मजबूत, उंची ५ फूट, केस



काळे, पुरुषासारखे कापलेले, डोळे काळे, रंगाने सावळी, चेहऱ्यावर डावे बाजूला गालावर गोलाकार केस आलेले, अगात पिवळ्या रंगाचा गाऊन, डोक्यावर कपडा बांधलेला आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा.

## माघी गणेशोत्सवानिमित्त रंगली भजनाची डबलबारी

### ■ भजनी कलाकारांच्या जुगलबंदीने रसिक मंत्रमुग्ध

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यामध्ये माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या माघी गणेशोत्सव मंडळ, हंबरपाडा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला संगीत भजनाचा डबलबारी सामना अत्यंत उत्साहात पार पडला.माघी गणेशोत्सव २२ जानेवारी रोजी रात्री मोठ्या जल्लोषात झालेल्या या सोहळ्यात परिसरातील शेकडो रसिक प्रेक्षकांनी हजेरी लावली होती.



जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ (नेवाळी) आणि शिवशक्ती प्रासादिक भजन मंडळ (वंजारपाडा-हंबरपाडा) या दोन भजनी मंडळांमध्ये अटीतटीची जुगलबंदी पाहायला मिळाली. नेवाळी मंडळाचे गायक योगेशबुवा गणपत दुर्गे यांनी आपल्या पहाडी आवाजात अभंग आणि गवळणी सादर करून रसिकांची दाद मिळवली. त्यांना पखवाजवर आदेश भगवान दुर्गे यांनी तर तबल्यावर आदेश बदे, दिलीप दुर्गे आणि ओमकार दुर्गे यांनी उत्तम साथ दिली. दुसऱ्या टप्प्यात वंजारपाडा मंडळाचे गायक प्रकाशबुवा हासू विरले यांनी आपल्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत भरली. त्यांना मृदंगमणी सुभाषबुवा भोईर आणि चकला वादक हरिश्चंद्रबुवा विरले व महेश मिसाळ यांची मोलाची साथ लाभली.दरम्यान या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास गायकवाड आणि हर्षद कांबरी यांनी केले तर समालोचक म्हणून रामचंद्रबुवा विरले यांनी जबाबदारी सांभाळली.

भजनाची डबल बारी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. हा भजनाचा कार्यक्रम पहाटेपर्यंत सुरू होता. पारंपारिक वाद्यांचा गजर आणि भक्तीरसात न्हाऊन निघालेल्या या वातावरणामुळे हंबरपाडा परिसरात चैतन्याचे वातावरण पसरले होते. मंडळाच्या वतीने सर्व उपस्थित भजनी कलाकार यांचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

## अल्युमिनियम प्लेटची चोरी करणारा अटकेत

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल परिसरात कंपनीच्या आवारातून अल्युमिनियम प्लेटची चोरी करणाऱ्याला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथील मॅराथॉन रियालीटी प्रा. लि कपंनीच्या आवारात असलेली १० हजार रुपये किमतीची ८ अल्युमिनियम प्लेटची चोरी झाल्याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुषंगाने पोलिसांनी तपास करून आरोपी शंकर कातकरी (२५) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## सोन्याचे गंठण चोरले

**नवीन पनवेल :** सहा तोळ्याच्या सोन्याच्या गंठणची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २१ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कैलास टिंगरे हे सेक्टर दोन इ, कळंबोली येथे राहत असून त्यांचा पत्नीने सोन्याची गंठण घरातील किचन मधील कुकरमध्ये ठेवली होती. ८ जानेवारी रोजी त्यातील सोन्याची गंठण अनोळखी ईसमाने घराचा दरवाजा चावीने निवडून चोरी करून नेली.

## मोटारसायकलची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल रेल्वे स्थानकाचे बाहेर रेल्वे मेंन्टनेन्स डेपोच्या जवळ मोकळ्या जागेत पार्क करून ठेवलेली रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

साईनगर येथील प्रणव पवार यांनी त्यांची एक लाख रुपये किमतीची रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट मोटारसायकल पनवेल रेल्वे स्थानकाचे बाहेर रेल्वे मेंन्टनेन्स डेपोच्या जवळ मोकळ्या जागेत पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती मोटारसायकल चोरून नेली. याबाबत प्रणव पवार यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## दागिने लंपास

**पनवेल :** पनवेल पाच वर्षीय मुलगा खेळत असताना त्याच्या गळ्यातील काळा धागा कापून सोन्याचे पान चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील डोंबाळे हे कळंबोली, सेक्टर एक येथे राहात असून, त्यांचा पाच वर्षीय मुलगा हा घरासमोर गल्लीत खेळत होता. यावेळी अनोळखी व्यक्तीने त्याच्या गळ्यातील काळा धागा कापला आणि त्यातील साडेचार हजार रुपयांचे सोन्याचे पान चोरून नेले.

## विजय इंगळेंना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

### माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सन्मान

| हमरापूर | प्रतिनिधी |

माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते विजय शंकर इंगळे यांना महाराष्ट्र जीवन गौरव परिषदेचा सन २०२५ चा गर्जा महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार नुकताच देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सामाजिक क्षेत्रातील कामगिरी पाहून त्यांना माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



मुंबईतील बांद्रा, कलानगर येथे नीलकंठ श्रीखंडे, कामगार नेते अभिजीत राणे, ज्येष्ठ वृत्तलेखक संतोष भोईर, कवी व लेखक मोहन जाधव यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमास कक्कया समाज महासंघ मुंबई प्रांताध्यक्ष राम कोकणे, कक्कया समाज गणेशोत्सव मुंबई अध्यक्ष हेमंत व्हटकर, ज्येष्ठ समाजसेवक ईश्वर पोळ, सामाजिक कार्यकर्ता सूरज भोईर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुशील कुमार शिंदे यांनी विजय इंगळे यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विजय इंगळे यांचे माणगाव शहरासह पंचक्रोशीत अभिनंदन होत आहे.

पान १ वरून

## अलिबाग नगरपरिषदेच्या विषय समित्यांच्या सभापतींची निवड

उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. तर, स्थायी समितीचे सभापती म्हणून प्रशांत नाईक, अनिल चोपडा आणि डॉ. साक्षी पाटील यांची निवड झाली आहे. तसेच प्रदीप नाईक व समीर ठाकूर यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांची निवड करण्यात आली असून, या समितीवर शैला भगत, ॲड. ऋषिकेश माळी आणि जमालउद्दीन सय्यद हे सदस्य आहेत.

वीज व सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी प्रशांत नाईक यांची निवड करण्यात आली असून, ॲड. नीलम हजारे, आनंद पाटील व योजना पाटील हे सदस्य असतील.

पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी अनिल चोपडा यांची निवड झाली असून, वृषाली भगत, संतोष गुरव आणि सागर भगत यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी डॉ. साक्षी पाटील तर उपसभापतीपदी ॲड. अश्विनी ठोसर यांची निवड करण्यात आली आहे. या समितीवर संध्या पालवणकर व ॲड. निवेदिता वाघमारे या सदस्य असतील. या समित्यांच्या माध्यमातून अलिबाग शहराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास नगरपरिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## नराधमाला पोलीस कोठडी

त्यावेळी व्हॅनमध्ये कुणीही महिला मदतनीस नव्हती. याच गोष्टीचा फायदा घेत नराधम व्हॅन चालकानं चिमुरडीवर अत्याचार केला. मुलगी दुपारी वेळेत शाळेतून घरी न परतल्यानं तिच्या पालकांनी शोधाशोध सुरू केली, तसंच शाळेतही फोन केला. उशिरानं पीडित चिमुरडी घरी आल्यावर तिनं आपल्यासोबत घडलेला सगळा प्रकार आईला सांगितला. हा प्रकार ऐकून पालकांना धक्काच बसला. त्यानंतर पीडित मुलीच्या पालकांनी तत्काळ बदलापूर पोलीस ठाण्यामध्ये धाव घेतली.

सुमारे दीड वर्षापूर्वी बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन चिमुरडींवर अत्याचार झाल्याच्या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. बदलापूरकरांच्या उद्रेकानंतर त्याच शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदे याला पोलिसांनी अटक केली होती. नंतर पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये अक्षय शिंदे याचा मृत्यू झाला होता. आता पुन्हा असा प्रकार घडलेल्या बदलापूर शाळेत लहान मुला-मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीनं उपाययोजना नाहीत. दरम्यान, ही शाळा अनधिकृत असल्याचा आरोप बदलापूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष तथा शिक्षण सभापती प्रियंका दामले यांनी केला आहे.

## लायन्स महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ

महोत्सव परिसरात ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, खरेदीसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महोत्सवाच्या पाचही दिवसांत नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनाच्या दिवशी सायंकाळी साडेसहा वाजता कराओके स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली. विविध गायकांनी मराठी व हिंदी गाण्यांच्या सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली.

शनिवार, दि. २४ रोजी दुपारी साडेतीन वाजता 'मम्मी सुगरण' पाककला स्पर्धा, तर सायंकाळी सहा वाजता ग्रुप डान्स स्पर्धा होणार आहे. रविवार, दि. २५ रोजी दुपारी साडेतीन वाजता 'खेळ पैठणीचा' आणि सायंकाळी सहा वाजता शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सोमवार, दि. २६ रोजी सायंकाळी पाच वाजता पेट अँड ब्रीड शो, तर रात्री आठ वाजता स्टँडअप कॉमेडी कार्यक्रम रंगणार आहे. महोत्सवाची सांगता मंगळवार, दि. २७ रोजी साडेपाच वाजता होणार असून, सायंकाळी सात वाजता इंडिएसा बँडचा धमाकेदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

एकूणच खरेदी, खाद्यसंस्कृती आणि भरगच्च मनोरंजन यांचा संगम साधणारा लायन्स महोत्सव अलिबागकरांसाठी पर्वणी ठरत असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## स्व. प्रभाकर पाटील यांना अभिवादन

यांच्या कार्याची माहिती देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. रायगड जिल्हा परिषदेच्या वतीनेदेखील प्रभाकर पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या आवारात असलेल्या प्रभाकर पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जिल्ह्यातील तालुका चिटणीस व शैक्षणिक, कला, सांस्कृतिक सामाजिक अशा वेगवेगळ्या संस्थेच्या वतीने प्रभाकर पाटील यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

अलिबाग नगरपरिषदेच्या कार्यालयात स्व. प्रभाकर पाटील, सुभाष चंद्रबोस आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अलिबागच्या नगराध्यक्ष अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेवक प्रशांत नाईक, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, नगरसेवक संतोष गुरव, संध्या पालवणकर, सुषमा पाटील, साक्षी पाटील, आनंद पाटील, ॲड. निवेदिता वाघमारे, समीर ठाकूर, ॲड. ऋषीकेश माळी, ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. नीलम हजारे, अनिल चोपडा, योजना पाटील, सागर भगत, शैला भगत, वृषाली भगत आदी उपस्थित होते.

## ...उपोषण स्थगित

चर्चेदरम्यान उपोषणकर्ते किरण केणी व प्रवीण मुठ्ठेनवार यांच्यासह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कमिटीचे अध्यक्ष अनिल पाटील, कमिटी सदस्य चांगुणा डाकी, कुंदा भोपी, किसान सभेचे अध्यक्ष कॉ. रामचंद्र म्हात्रे, सेक्रेटरी कॉ. संजय ठाकूर तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विभागातील अधिकारी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये नामफलकाचे अनावरण

| पनवेल | प्रतिनिधी |

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्र. १९ मध्ये नामफलकाचे उदघाटन शिवसेना पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या हस्ते जुने तहसील कार्यालय येथे करण्यात आले. या सामाजिक उपक्रमासाठी उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे यांनी पुढाकार घेतला.




पूर्वी शिवसेनेच्या फलक संस्कृतीच्या माध्यमातून नागरिकांच्या अनेक समस्या मांडण्याचे काम होत असे त्यामुळे सत्ताधाऱ्यांना त्या-त्या प्रभागातील समस्या कळत असत, अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्याचे काम हे फलक संस्कृती द्वारे होत असे, तसेच नागरिकांना आपल्या विभागातील माहिती देणाचे काम हे फलकाद्वारे होत असे. बाळासाहेबांची शिकवण म्हणजे ८०% समाजकारण व २०% राजकारण या धोरणानुसार उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे यांनी अनेक दिवसांच्या प्रयत्नाने नामफलकाचे अनावरण बाळासाहेबांच्या जन्मशताब्दी निमित्ताने करून घेतले आहे. नागरिकांच्या समस्या, सामाजिक कार्यक्रम, लोकहिताच्या बातम्या, प्रभागातील उत्सव, त्याचप्रमाणे लेखणीच्या माध्यमातून फलकाद्वारे लोकहीत साधण्याचे उत्तम काम या प्रभागात होणार आहे. या उदघाटन प्रसंगी बोलताना प्रथमेश सोमण यांनी सांगितले की प्रत्येक विभागात असे भविष्यात आम्ही नामफलक लावणार असून,जनतेचा आवाज बुलंद करून त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम पनवेल महानगरपालिका प्रभागात आम्ही करणार आहोत.

आमच्या सामाजिक कार्याच्या जोरावर भविष्यात आम्ही अनेकांचे शिवसेनेत पक्ष प्रवेश करून घेणार असल्याचे सूतोवाच त्यांनी यावेळी केले. नामफलकाच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे,शहरप्रमुख प्रसाद सोनवणे,अभिजित साखरे, मंदार काणे, खंडेश धनावडे, सिद्देश खानविलकर, विक्रम पाटणकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## ५२ हजारांची फसवणूक

**पनवेल :** एटीएम कार्डची अदलाबदली करून ५२ हजार २२ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साधना बोहरा या तक्का गाव येथे राहात असून, त्या रोख रक्कम काढण्यासाठी घरातून पायी निघाल्या. त्या रेल्वे स्टेशनजवळील एटीएम मध्ये गेल्या, पैसे काढण्यासाठी एटीएम टाकला असता दोन अनोळखी ईसम आले आणि एटीएम खराब आहे, असे बोलून त्यांनी एटीएम कार्ड हातातून घेतले. आणि नकळत एटीएम कार्डची अदलाबदली करून त्याच्याजवळील एटीएम कार्ड बोहरा यांना दिले. आणि तेथून तो निघून गेला. त्यानंतर त्यांनी ओळखीच्या व्यक्तीला एटीएम देऊन पैसे काढण्यास सांगितले, मात्र एटीएममधून पैसे आले नाहीत. त्यानंतर बँकेत जाऊन पाहिले असता पैसे काढल्याचे समजले.



## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन

| पनवेल | प्रतिनिधी |

हिंदू हृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना त्यांच्या १००व्या जयंतीनिमित्त पनवेल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखेने अभिवादन केले.

यावेळी शहर प्रमुख प्रविण जाधव, महिला संघटिका उज्वला गावडे, विभाग संघटिका अश्विनी देसाई, प्रशांत नरसाळे, जुनैद पवार, निखिल भगत, भास्कर पाटील, कुणाल कुरघोडे, प्रदीप माखीजा, मयुरेश पाटील, आदिल आवसेकर, राजेश शेट्टीगार, बापू जोशी, नूर वाईकर, सचिन कदम आदी उपस्थित होते.

## भाजपा गटनेतेपदी सागर नाईक

| नवी मुंबई | प्रातिनिधी |

नवी मुंबई महापालिकेच्या महापौरपदी कोणाची नियुक्ती होणार, याची उत्सुकता असतानाच नवी मुंबई भारतीय जनता पक्षाने गटनेत्यासह ६६ नगरसेवकांची कोकण भवन येथे शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी नोंदणी केली आहे. यावेळी माजी खा. संजीव नाईक, माजी आ. संदीप नाईक, नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, माजी महापौर सागर नाईक, अभिजीत पेडणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, नवी मुंबई महानगरपालिकेत भाजपा पक्षाचा गटनेता म्हणून माजी महापौर सागर नाईक यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे.






● अलिबाग नगरपरिषदेच्या विशेष समित्यांची निवड शुक्रवारी (दि.२३) करण्यात आली. निवड झालेल्या सभापती आणि सदस्यांचे नगराध्यक्ष अक्षया नाईक आणि उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी अभिनंदन केले. (छायाचित्र - समीर मालोदे)

## नि|व|ड|क



● सौ. सुप्रिया जयंत पाटील, सौ. चित्रलेखा नृपाल पाटील आणि समस्त कृषीवल परिवारा तर्फे मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर यांना महाराष्ट्रातील नंबर १ हळदी कुंकूचे वाण देताना कृषीवलच्या जाहिरात प्रमुख भैरवी पाटील-जाधव दिसत आहेत. (छाया: गणेश चोडणेकर)



### रसायनीत पारो चित्रपटाचे प्रमोशन

**रसायनी :** जीवनात यशस्वी होण्यासाठी कायम शांत डोक्याने मेहनत घेणे आवश्यक आहे, तरच जीवनात आमूलाग्रह बदल होऊन भविष्य उज्वल होईल, यूफोरिया म्हणजे अत्यंत आनंद, परमानंद, सुखाची भावना निर्माण होते. जिथे व्यक्तीला खूप जास्त उत्साह आणि आनंदी वाटते, असे उद्गार सुप्रसिद्ध कलाकार ताहा शाह बडूशा यांनी मोहोपाडा रसायनी येथील पिल्लई कॉलेजच्या कॅम्पसमध्ये बोलताना सांगितले. पारो द अनटोल्ड स्टोरी ऑफ ब्राइड स्लेव्हरी हा एक प्रभावी आणि भावनिकरित्या ढवळून टाकणारा चित्रपट प्रदर्शित होत असून त्याचा प्रमो रसायनीत पार पडला.यावेळी रसायनीतील पिल्लई कॉलेजच्या वार्षिक साहित्य सांस्कृतिक कार्यक्रमात ऑस्कर लीगल ॲडव्हायझर कंपनीचे संस्थापक अक्षत खेतान प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.भारतीय चित्रपट सृष्टीतील सेलिब्रिटी ताहा शाह बदुशा त्यांच्या ऑस्कर पारोमध्ये सूचीबद्ध असलेल्या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आले होते. अभिनेता ताहा शाह बडुशा एका धाडसी नवीन भूमिकेत दिसणार आहे, जी लोकांच्या धारणांना आव्हान देईल. यावेळी डॉ.निवेदिता श्रेयांश, इंजिनिअर विभागाचे मुख्याध्यापक डॉ.जगदीश बाकल, डॉ.रिंकू शांतनु, अमर मांगे, ममता पाटील, अमृत देशपांडे उपस्थित होते.

### चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

**रसायनी :** पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील चावंढोली गावात अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळेस किराणा दुकान फोडल्याची घटना घडली. चांवढोळी येथील श्रीराम किराणा सुपर मार्केटच्या छतावरील सिमेंटचा पत्रा तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण ३१ हजार ७०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला. सकाळी दुकान उघडण्यास आल्यावर दुकान मालक रमेशकुमार सिर्वही याने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी रसायनी पोलिसांनी तात्काळ तपास चक्र फिरवत सीसीटीव्हीच्या माध्यमातून अखिलेशकुमार परदेशी राम (वय २४) व त्याचा साथीदार यांना ताब्यात घेतले व अटक केली आहे. त्यांच्याकडून दुकानात असणारा ३१ हजार ७०० रूपयाचा माल ताब्यात घेतला आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा शशांक पिंगळे अधिक तपास करीत आहेत.

# वावंजे जिल्हा परिषद मतदार संघातून शेकाप विजयी होणार

■ माजी सभापती काशिनाथ पाटील यांचा विश्वास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वावंजे जिल्हा परिषद मतदार संघ हा नेहमीच शेतकरी कामगार पक्षाचा राहिला असून यावेळी या ठिकाणाहून लता धनराज म्हात्रे यांना महाविकास आघाडीच्या माध्यमातून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवडणुकीच्या मैदानात उतरविले आहे. त्या निश्चितपणे आघाडी घेऊन या मतदारसंघातून रायगड जिल्हा परिषदेवर निवडून जातील असे काशिनाथ पाटील यांनी सांगितले.



निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे रायगड जिल्हा आणि पंचायत समितीची निवडणूक ५ फेब्रुवारी २०१७ रोजी होत असून. वावंजे जिल्हा परिषद मतदार संघातून लता धनराज म्हात्रे, वावंजे पनवेल पंचायत समिती मतदारसंघातून पराग कचरू भोपी आणि चिंधरण पंचायत समिती मतदार संघातून बाळू गोमा वारा यांनी आपली उमेदवारी अर्ज पनवेल तहसील कार्यालयामध्ये भरले. यावेळी महाविकास आघाडी आणि शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पनवेल येथील शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून भव्य अशी रॅली काढून पनवेल तहसीलदार कार्यालयामध्ये त्यांचे अर्ज भरले.

यावेळी काशिनाथ पाटील यांनी सांगितले पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आमच्याकडून उमेदवार निवडीसाठी विलंब झाला आणि त्याचा परिणाम निवडणुकीमध्ये झाला. ते रायगड जिल्हा परिषदेमध्ये होऊ नये यासाठी आम्ही खबरदारी घेऊन आम्ही या तिन्ही उमेदवारांच्या अर्ज दाखल केले आहेत.

यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, नारायण घरत, वावंजे ग्रामपंचायतीचे सरपंच डी. बी. म्हात्रे, हेमराज म्हात्रे वावंजे आणि चिंधरण मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाचे आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पेण येथे बालसंस्कार शिबिराचा समारोप



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा रायगड उत्तर अंतर्गत शाखा तालुका पेण व श्रमण बुद्ध विहार कमेटी व क्रांतीनगर ग्रामस्थ यांच्या वतीने पाच दिवसीय बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराचा समारोप पेण येथे गुरुवारी (दि.२२) उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे यांनी मोलाचे मार्गदर्शन करीत उपस्थितांना संबोधित केले.

रविवारी (दि.१८) ते गुरुवारी(दि.२२) या पाच दिवसांच्या कालावधीत झालेल्या बालसंस्कार शिबिराचे अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या शिबिरात ४६ शिबिरार्थी सहभागी झाले होते. पाच दिवस चाललेल्या शिबिराला जिल्ह्यातील केंद्रीय शिक्षकांनी विविध विषयावर खूप साध्या भाषेत शिबिरार्थींना सहज समजेल असे सखोल मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप गुरुवारी (दि.२२) जिल्हा अध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी जिल्हा सरचिटणीस प्रकाश सोनावणे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष संतोष जाधव उपस्थित होते. यावेळी सुशील वाघमारे यांनी बाल संस्कार शिबिरे घेणे व त्याचे सातत्य ठेवणे खुप महत्वाचे असुन ते काम पेण तालुका यशस्वीपणे करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी २४ शिबिरे व २२ प्रतिज्ञा या विषयावर सखोल भाष्य केले. यावेळी जिल्ह्याच्या वतीने प्रमाणापत्र देऊन सन्मान करण्यात आला. शैला गायकवाड यांच्याकडून भेट वस्तू देऊन शिबिरार्थींना देण्यात आले. जिल्हा सरचिटणीस प्रकाश सोनावणे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष जाधव, शशिकला गायकवाड, हर्षल मोरे, सचिन कांबळे यांनी शुभेच्छापर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत सोनावणे यांनी पेण तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सांगितली. त्यांनी शिबिरार्थिना मार्गदर्शन करताना उपस्थितांना भावनिक आवाहन करीत सांगितले की येणाऱ्या काळात आपण भव्य श्रामणेर बौद्धाचार्य शिबीर घेत असून त्या शिबिरात आपण मोठ्या संख्येने सामील व्हावे, असे आवाहन केले.

# मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृती मोहीम

**। तळे । प्रतिनिधी ।**

तळा येथील श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानच्या जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथे मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रांगोळी व भित्तीपत्रके प्रदर्शनाचे तळा तालुक्याचे नायब तहसीलदार मंगेश पालांडे, बालविकास प्रकल्प अधिकारी दिपाली शेळके यांनी फीत कापून उद्घाटन केले. या प्रसंगी कार्यक्रम सदस्य मंजुळा शेडगे व किरण बंदुके हेही उपस्थित होते.

या प्रदर्शनाच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीवर आधारित विविध आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. याचबरोबर विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीचे पोस्टर्सही तयार केले होते. विद्यार्थ्यांच्या या कलेचे कौतुक केले. त्यानंतर नायब तहसीलदार पालांडे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व सांगितले व त्यासाठी प्रेरित केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी नवीन मतदारांना नोंदणी करून शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. शंभर टक्के मतदान झाले पाहिजे, जेणेकरून लोकशाहीची हानी होणार नाही, असे डॉ. बंगाळे म्हणाले. शेळके यांनी स्वीप अंतर्गत या कार्यक्रमाचे सुंदर आयोजन झाल्याचे नमूद करत सर्वांना शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमादरम्यान मतदार शपथ घेण्यात आली व मतदानाचे घोषवाक्य, जनजागृती स्वाक्षरी मोहीम व मतदान गीत दाखवण्यात आले.

### श्रीवर्धन येथे रक्तदान शिबीर

**श्रीवर्धन :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त शिवसेना शहर श्रीवर्धन यांच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर महाड येथील जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरीत्या पार पडले. या रक्तदान शिबिरामध्ये ४० रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

**पालीत भक्ती आणि कलेचा अपूर्व संगम | २४ तासांच्या परिश्रमातून कलाकारांनी साकारली भव्य कलाकृती**

# पालीत रंगांतून अवतरली बल्लाळेश्वराची पालखी

**। पाली/बेणसे। प्रतिनिधी ।**

अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्री बल्लाळेश्वर पाली नगरीत गणेश जयंतीचे औचित्य साधून भक्ती आणि कलेचा एक अपूर्व संगम भाविकांना पाहायला मिळत आहे. पालखी बल्लाळेश्वराची या भक्तीमय संकल्पनेवर आधारित ६ बाय १२ फूट आकाराची भव्य रांगोळी सध्या भाविकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली आहे.



महाराष्ट्र राज्याचे नामांकित आर्टिस्ट योगेश डाकी यांच्या कल्पनेतून ही नेत्रदीपक रांगोळी साकारण्यात आली आहे. ही कलाकृती पूर्ण करण्यासाठी योगेश डाकी यांच्यासह अरुण काळोखे (पहूर), जय भोईर (अंबरनाथ), हर्षल डाकी (शेतपळस) आणि सुयोग म्हस्कर या कलाकारांच्या चमूने सलग २४ तास मेहनत घेतली. यासाठी सुमारे १० किलो रंगांचा वापर करण्यात आला आहे.

या रांगोळीमध्ये वारकरी परंपरा, ढोल-ताशांचा नाद, टाळ-मृदंगांचा गजर आणि भाविकांचा भक्तीभाव इतक्या बारकाव्याने रंगवला आहे की, जणू काही बल्लाळेश्वराची पालखी प्रत्यक्ष पालीच्या भूमीतून मार्गस्थ होत असल्याचा भास निर्माण होतो. कलाकारांच्या रंगसंगती आणि जिवंत मांडणीमुळे भाविक या रांगोळीसमोर नतमस्तक होत आहेत.या उपक्रमासाठी श्री बल्लाळेश्वर देवस्थान संस्थानचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच नाना ठोंबरे, तुषार ठोंबरे आणि पाली येथील वेडे चाळे ग्रुप यांनी या कलाकृतीसाठी विशेष मदत केली.येणाऱ्या काळात गणेश जयंतीनिमित्त यापेक्षाही अधिक भव्य आणि भव्यदिव्य रांगोळ्या साकारण्याचा आमचा मानस आहे. अशी भावना योगेश डाकी यांनी यावेळी व्यक्त केली.

## हार्दिक अभिनंदन



भारतीय कृषक समाज रायगड विभागीय अध्यक्ष श्री. भास्कर गवाणे यांची डॉ. पंजाबराव देशमुख को.ऑप.टीव्ह सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य याची संस्थेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!

**शुभेच्छुक**

भारतीय कृषक समाज कार्यकारणी श्री. रुपेश लाड, अमर पवार, पांड्या वाघमारे, प्रमोद झावरे, श्री. कमलेश जैन, विकास रणपिसे, कृष्णा साकोसकर, श्री. विठोबा खानावकर, संतोष शिदे, सुजल अडसुळे, सोमा पांचागा, श्री. खेळ्या दरोडा आणि अलिबाग तालुका कृषक समाज पदाधिकारी व जिल्हा कार्यकारिणी.

# लबाड्या आणि लबाड्या

स्वित्झर्लंडमध्ये दावोसला भरलेली यंदाची परिषद म्हणायलाच केवळ आर्थिक होती. तिथे प्रत्यक्षात राजकारणाचीच अधिक चर्चा झाली. तिथे कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची नाव न घेता लक्तरे काढली. कायदा व न्यायाच्या आधारे जी काय जेमतेम व्यवस्था चालू होती ती अमेरिकेने खतम केली आहे असा घणाघात अमेरिकेचा शेजारी देश असलेल्या कॅनडाच्या पंतप्रधानांनी केला. त्यांचे भाषण इतके प्रभावी झाले की, सर्व उपस्थितांनी त्यांनी उभे राहून अभिवादन केले. हे सर्व ट्रम्प यांनी ग्रीनलँड ताब्यात घेण्याच्या दिलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर घडले. अमेरिकेपासून ५ हजार किलोमीटर दूर अंतरावर असलेला ग्रीनलँड नावाचा प्रदेश सध्या डेन्मार्कच्या अखत्यारीत आहे. रशियाशी युध्द झालेच तर तिथून अमेरिकेकडे येणारी क्षेपणास्त्रे अडवण्यासाठी आम्हाला ग्रीनलँडचा ताबा हवा आहे असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. याला युरोपातील सर्व देशांनी विरोध केला. त्यावर ट्रम्प यांनी युरोपवर १० टक्के आयातकर लावण्याचा इशारा दिला. युरोपनेही त्याला प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला. त्यानंतर दावोसमध्ये कॅनडाच्या नेत्यांनी ही टीका केली. मग ट्रम्प यांनी माघार घेतली. आपण ग्रीनलँडमध्ये सैन्य घुसवणार नाही आणि युरोपसोबत वाटाघाटींमध्ये यशस्वी तोडगा निघाला आहे असा दावा त्यांनी केला. या प्रकरणात कार्नी यांच्या भाषणाचे सध्या सर्वत्र कौतुक सुरू आहे. भारतातले पुरोगामीदेखील त्याचा दाखला देऊन मोदींनी असे बोलायला हवे असे सुनावत आहेत. नरेंद्र मोदींचा तमाम शूरपणा आणि विश्वगुरुत्व ट्रम्प यांनी गेल्या वर्षभरात उघडे पाडले आहे यात अजिबात शंका नाही. पाकिस्तानसोबतचे युध्द आपल्यामुळेच बंद झाले हा ट्रम्प यांचा दावा कायम आहे. शिवाय भारतावर ५० ते ५०० टक्के आयातकर लावला जाऊनही मोदी किंवा त्यांचे मंत्री तोंड उघडून निषेधाचा एक शब्दही काढत नाहीत हे पुन्हा पुन्हा दिसले आहे. मोदींच्या धमक्या, त्यांचे शौर्य, त्यांची ५६ इंची छाती आपल्या भक्तांना दाखवण्यापुरतीच आहे हे पुरेसे स्पष्ट झाले आहे. ट्रम्प यांना काहीही जबाब देण्याची हिंमत त्यांच्यात नाही. याने भारताची मान पुरेशी खाली गेली आहे.

### तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म

मात्र कॅनडा व युरोपचा जो स्वाभिमान आता जागृत झाला आहे तीही एक नंबरची लबाडी आहे हे इथे सांगायला हवे. इतके वर्षे सगळा युरोप अमेरिकेचे शेपूट म्हणून वावरला. त्याचे फायदे त्याने उचलले. आता ट्रम्प यांनी युरोपातल्याच एका देशावर कबजा करायचे धोरण आखल्यावर त्यांना जाग आली आणि त्यांना न्यायाची वगैरे आठवण झाली. यापूर्वी बुश यांनी इराकवर हल्ला करून सद्दाम हुसेन यांना ठार केले. इराककडे रासायनिक अस्त्रे असल्याचा तद्दन खोटा दावा अमेरिकेने त्यासाठी केला व ब्रिटनसहित सर्व देशांनी हा दावा खोटा आहे हे ठाऊक असूनही अमेरिकेच्या बरोबरीने इराकमध्ये सैन्य घुसवले. इराकमधील तेलाचा कबजा करण्यासाठी हे सर्व नाटक चालू होते हे सर्व जगाला कळत होते. पण ब्रिटन आणि फ्रान्सच्या सरकारांना कळत नव्हते. हीच गोष्ट नंतर लिबियामध्ये मुअम्मर गदाफी याला मारले गेले तेव्हा झाली. अगदी अलिकडे व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांना अमेरिकी सैन्याने मध्यरात्री कारवाई करून उचलून आणले. एखाद्या गुंड टोळीने अपहरण करावे तसाच हा प्रकार होता. पण याबाबत युरोपने चकार शब्द काढला नाही. आज कार्नी काहीही म्हणत असले तरी मादुरो यांचे अपहरण करण्याचा कॅनडाने तेव्हा निषेध केला नव्हता. उलट व्हेनेझुएलामध्ये आता तरी लोकशाही प्रस्थापित होईल असा मानभावी पवित्रा घेऊन ट्रम्प यांना अप्रत्यक्ष पाठिंबाच दिला होता. युरोपच्या इतर देशांचीही स्थिती हीच होती. आम्ही स्थितीवर लक्ष ठेवून आहोत अशी प्रतिक्रिया बहुसंख्य देशांनी दिली होती. मोदींच्या भारतानेही ट्रम्प यांचा निषेध करणे सोडाच, पण व्हेनेझुएलातील घटनांबाबत चिंताही व्यक्त केली नव्हती. केवळ आम्ही स्थितीवर नजर ठेवून आहोत इतकेच भारताने म्हटले होते. भारताचे एक ठीक आहे. पण एरवी लोकशाही, न्याय आणि कायद्याच्या राज्याच्या गप्पा मारणाऱ्या युरोपीय देशांची तेव्हा दातखीळ बसली होती. आता अमेरिकेने युरोपला त्याची लायकी दाखवून द्यायला सुरुवात केल्यावर त्याच्या नेत्यांना कंठ फुटला आहे. नाटो कराराअंतर्गत अमेरिका व युरोप हे भागीदार आहेत.

### काप गेले आणि भोके राहिली

गेली ७५ वर्षे नाटोसाठी पैसे व शस्त्रपुरवठा अमेरिका करीत आली. त्यामुळे युरोपीय देशांना आपला संरक्षण खर्च कमीत कमी ठेवता आला. अमेरिकेचे पैसे घेऊन जगाला लोकशाहीचा उपदेश करीत फिरण्याची चैन युरोपला करता आली. आफ्रिका व आशियातील गरीब देशांवर रुबाब झाडता आला. त्यांना नाडता आले. आता ट्रम्प यांनी रोकडा व्यवहार चालू केला. युरोपने आपल्या वाट्याचा खर्च उचलावा असे त्यांनी बजावले. शिवाय आयातकरांमधून युरोपला सूट मिळणार नाही हे स्पष्ट केले. परवा कार्नी यांचे भाषण झाल्यावर कॅनडा अमेरिकेच्या पैशावर जगतो आहे अशी टीका ट्रम्प यांनी केली. ती जिव्हारी लागणारी होती. कॅनडा हा श्रीमंत देश असला तरी त्याला अमेरिकेच्या शेजाराचा भरपूर फायदा झाला आहे. आजवर त्या दोन देशांमध्ये व्हिसाचे बंधन नव्हते. आपसातील सीमा मुक्त होती. शिवाय अनेक आयातनिर्यातीत कॅनडाला सवलती होत्या. पण आता इतक्या सवलती देत बसण्यापेक्षा कॅनडाला अमेरिकेच्याच अखत्यारीत का आणू नये असे ट्रम्प यांना वाटते आहे. परवा त्यांनी ग्रीनलँड तसेच कॅनडा या प्रदेशांवर अमेरिकी झेंडा फडकतो आहे असे एक चित्र प्रदर्शित करून आपली इच्छा जाहीर केली. यापूर्वीही ते तसे बोलले आहेत. थोडक्यात मित्रांनाच खाऊन टाकायचे हा जो आपल्या देशातल्या भाजपचा मंत्र आहे तोच ट्रम्प जागतिक राजकारणात राबवू पाहत आहेत. ट्रम्प हे तर बोलून चालून गुंड आहेत. पण युरोप हाही धुतल्या तांदळासारखा नाही. तोही तितकाच लबाड आणि कावेबाज आहे. युरोपकडे नवीन जगाला देण्यासाठी विशेष असे काहीही नाही. आयटी किंवा एआयचे तंत्रज्ञान म्हणाल तर त्यातले सर्वोत्तम आहे ते अमेरिकेत घडते आहे. दुसरीकडे चीन जगातला सर्वात मोठा उत्पादक तसेच बलिष्ठ व्यापारी झाला आहे. त्याने ट्रम्पच्याही नाकी नऊ आणले आहेत. बलाढ्य अशा जर्मनीतील मोटार उद्योग किंवा इंजिनिअरिंग उद्योगालाही चीनने तडाखे पोखरून टाकले आहे. लोकशाहीविषयी बोलण्यासाठीही बडबड, संस्कृतीच्या गप्पा आणि इतिहासाचे अवडंबर यापलिकडे युरोपकडे आज फारसे काहीही शिल्लक नाही. गोऱ्या वर्णवर्चस्ववादाच्या जोरावर युरोपने भारत, इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर किंवा आफ्रिका इत्यादी देशांवर एक गारूड करून ठेवले आहे. पण ट्रम्प यांनी हा सर्व पोकळपणा उघड केला आहे. युरोपसोबतच्या संघर्षात तूर्त ट्रम्प यांनी माघार घेतली आहे. पण ग्रीनलँडवरचा आपला हक्क सोडलेला नाही. लबाड्यांचे पुढचे अध्याय चालू राहणार आहेत.

**विचार**

# रिअल इस्टेट-तांबे चमकले; कच्चे तेल घसरले

***अर्थनगरीत सरत्या आठवड्यामध्ये काही लक्षवेधी बातम्या ऐकायला मिळाल्या. पहिली महत्वाची बातमी म्हणजे बाजारात सोन्या-चांदीपाठोपाठ तांब्यालाही चमक लाभत असल्याने त्यात गुंतवणुकीला वाव आहे. दुसरी बातमी म्हणजे येत्या काळात कच्च्या तेलाच्या किमतीत घट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारताची युरिया आयात दुप्पट झाली आहे. सरतेशेवटी, घर खरेदी सोपी आणि स्वस्त होणार असल्याचीही बातमी आहे.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरीत सरत्या आठवड्यामध्ये काही लक्षवेधी बातम्या ऐकायला मिळाल्या. त्याचे परिणामही लक्षवेधी असणारा आहेत. पहिली महत्वाची बातमी म्हणजे बाजारात सोन्या-चांदीपाठोपाठ तांब्यालाही चमक लाभत असल्याने त्यात गुंतवणुकीला वाव आहे. दुसरी दिलासादायक बातमी म्हणजे येत्या काळात कच्च्या तेलाच्या किमतीत घट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारताची युरिया आयात दुप्पट झाली आहे. सरतेशेवटी, घर खरेदी सोपी आणि स्वस्त होणार असल्याची बातमी अनेकांचे कान टवकारुन गेली.

तांब्याच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. तांब्याच्या किमती पहिल्यांदाच प्रति टन १३ हजार डॉलर्सच्या पुढे गेल्या आहेत. तांब्याच्या पुरवठ्यातील कमतरता, चिली या देशातील खाणींमधील संप आणि गोदामांमध्ये कमी तांब्याचा साठा यामुळे ही वाढ होत आहे. जागतिक स्तरावर तांब्याच्या किमतीही गगनाला भिडत आहेत. अमेरिकेत 'कोमेक्स' तांब्याच्या किमती ४.६ टक्क्यांनी वाढून ५.९००५ प्रति पौंड किंवा १३,००८ प्रति टन या विक्रमी उच्चांकावर पोहोचल्या आहेत. लंडन मेटल एक्सचेंज (एलएमई) मधील तांब्याच्या साठ्यात घट झाल्यामुळे तांब्याच्या किमतीत वाढ झाली आहे. ती ऑगस्टच्या अखेरीस ५५ टक्क्यांनी घसरली आहे. 'एलएमई' तांब्याच्या साठ्यात आता एक लाख ४२ हजार ५५० टनांचा समावेश आहे. 'एलएमई' प्रणालीतून बाहेर पडणारे बहुतांश तांबे अमेरिकेत पाठवण्यात आले आहे. तेथील तांब्याच्या दराचा सध्या आढावा घेतला जात आहे. तथापि, एक ऑगस्टपासून तांब्याच्या आयातीवरील आयात शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. उत्तर चिलीतील कॅपस्टोन कॉपरच्या मांटोव्हर्डे तांबे आणि सोन्याच्या खाणीत सुरू असलेल्या संपामुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. तांब्याच्या पुरवठ्यात तूट येण्याची शक्यता वाढली आहे. खाणीतून २९ हजार ते ३२ हजार टन तांबे उत्पादन होण्याची अपेक्षा आहे. हे या वर्षीच्या एकूण जागतिक उत्पादनाच्या (अंदाजे २४ दशलक्ष टन) एक छोटासा भाग दर्शवत असले, तरी त्यामुळे संभाव्य उत्पादन परिणामाबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

दुसरी दखलपात्र बातमी म्हणजे अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यात सुरू असलेल्या वादाचा परिणाम जवळजवळ संपूर्ण जगावर होण्याची अपेक्षा आहे. विशेषतः तेलक्षेत्रावर त्याचा जास्त परिणाम होण्याची अपेक्षा आहे. दोन्ही देशांमधील या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती तात्पुरत्या प्रमाणात वाढल्या आहेत. या घटनेनंतर भारतीय तेल क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ दिसून आली. विश्लेषकांच्या अहवालांनुसार, जागतिक तेल पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे नजीकच्या भविष्यात कच्च्या तेलाच्या किमतीत घट होऊ शकते. याचा परिणाम तेल बाजार, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती, रुपया आणि देशाच्या आर्थिक वाढीवर होऊ शकतो. 'नुवामा' संस्थात्मक इक्विटीज म्हणते, की आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये तेल आणि वायू क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात अंदाजे १७ टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे. अहवालात 'रिलायन्स इंडस्ट्रीज'ला त्यांच्या रिफायनिंग आणि डिजिटल व्यवसायांकडून पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. तेल विपणन कंपन्यांच्या उत्पन्नात सुधारणा झाल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढू शकते. तथापि, उत्पादनात कपात आणि कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाल्यामुळे 'ओएनजीसी'ला तोटा सहन करावा लागण्याची शक्यता आहे. 'गेल'सह इतर गॅस कंपन्यांसाठी परिस्थिती आव्हानात्मक राहू शकते.

'स्टेट बँक रिसर्च रिपोर्ट'मध्ये म्हटले आहे, की 'ओपेक प्लस'च्या उत्पादन वाढवण्याच्या निर्णयापासून कच्च्या तेलाच्या किमती कमकुवत राहिल्या आहेत. नंतर काही पुरवठा कपात लागू करण्यात आली, तरी किमतींवर फारसा परिणाम झाला नाही. स्टेट बँकेच्या अहवालानुसार, २०२६ च्या सुरुवातीला ब्रेंट क्रूड सरासरी ५५ डॉलर प्रति पंपाच्या आसपास असू शकते. भारतातील कच्च्या तेलाच्या किमती ब्रेंटशी जोडल्या गेल्या असल्याने देशांतर्गत तेलाच्या किमतीदेखील स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, मार्च २०२६ पर्यंत भारताला अदा करावी लागणारी किंमत सुमारे ५३ डॉलर प्रति पिंप आणि जून २०२६ पर्यंत सुमारे ५२ डॉलर प्रति पिंपापर्यंत येऊ शकते. 'एसबीआय रिसर्च'चा विश्वास आहे, की कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर थेट परिणाम होईल. यामुळे इंधनाच्या किमतींमध्ये घट होऊ शकते.

अशीच एक खास बातमी म्हणजे देशांतर्गत उत्पादनात घट झाल्यामुळे २०२५-२६ च्या पहिल्या आठ महिन्यांमध्ये भारताची युरिया आयात दुप्पट होऊन ७.१७ दशलक्ष टन झाली आहे. ती शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी देशाची परदेशी पुरवठ्यावरील वाढते अवलंबित्व दर्शवते. 'फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया' (एफएआय)ने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, एप्रिल-नोव्हेंबर २०२४-२५ दरम्यान युरिया आयात १२०.३ टक्क्यांनी वाढून ७.१७ दशलक्ष टन झाली आहे. ती गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ३.२६ दशलक्ष टन होती. डेटानुसार, एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान देशांतर्गत युरिया उत्पादन ३.७ टक्क्यांनी घटून १९.७ दशलक्ष टन झाले. एकूण युरिया विक्री २.३ टक्क्यांनी वाढून २५.४ दशलक्ष टन झाली. 'एफएआय'चे अध्यक्ष एस. शंकर सुब्रमण्यम यांनी एका निवेदनात म्हटले आहे, की समन्वित नियोजनाद्वारे आपण विक्री वाढ साध्य केली असली, तरी आयातीवरील लक्षणीय अवलंबित्व धोरणात्मक पुरवठा साखळी व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित करते. नोव्हेंबर २०२४ मध्ये ७.८ दशलक्ष टनांच्या तुलनेत नोव्हेंबरमध्ये युरिया आयात ६८.४ टक्क्यांनी वाढून १३१ दशलक्ष टन झाली. नोव्हेंबरमध्ये युरियाची विक्री मागील वर्षाच्या तुलनेत ४.८ टक्क्यांनी वाढून ३.७५ दशलक्ष टन झाली. मातीतील आणखी एक महत्त्वाचा पोषक घटक असलेल्या डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) वरील आयात अवलंबित्वदेखील वाढत आहे. गेल्या वर्षी ५६ टक्के असलेल्या डीएपी आयातीचा वाटा आता एकूण पुरवठ्याच्या ६७ टक्के आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या एप्रिल-नोव्हेंबरदरम्यान विक्री ७.१२ दशलक्ष टनांवर स्थिर राहिली. देशांतर्गत डीएपी उत्पादन ५.२ टक्क्यांनी घटून २.६८ दशलक्ष टन झाले. 'एफएआय'चे महासंचालक डॉ. सुरेश कुमार चौधरी म्हणाले, की या आकडेवाऱ्यांमधून दोन महत्त्वाचे निष्कर्ष समोर येतात. नायट्रोजन आणि फॉस्फेट पोषक तत्वांसाठी आयात-आधारित पुरवठा व्यवस्थापनापेक्षा संरचनात्मक बदल होत आहे. 'एसएसपी'सारख्या स्वदेशी फॉस्फेट खतांची कामगिरी चांगली आहे. त्यांच्या विक्रीत १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हे संतुलित दृष्टिकोन दर्शवते. आता एक खास बातमी. आपल्या स्वत:चे हक्काचे घर असावे असे प्रत्येकालाच वाटते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजही कोट्यवधी लोक जीवाचे रान करतात. आजघडीला घरांची वाढलेली किंमत लक्षात घेता सामान्य लोकांचे घर घेण्याचे स्वप्न अपूर्ण राहण्याची भीती व्यक्त केली जाते. असे असतानाच आता सर्वांचे लक्ष आगामी अर्थसंकल्पाकडे लागले आहे. केंद्र सरकार यंदाच्या अर्थसंकल्पात घर खरेदी आणि व्यवहारासंदर्भात काही महत्त्वाच्या तरतुदी करून सामान्यांना दिलासा देऊ शकते. गेल्या काही दिवसांपासून देशात घरांची किंमत २५ ते ३० टक्क्यांनी वाढली आहे; परंतु लोकांच्या उत्पन्नाचा स्त्रोत किंवा मिळकत मात्र याच वेगाने वाढलेली नाही. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार देशात सध्या लोकांवर २७ लाख कोटी रुपयांचे गृहकर्ज आहे. म्हणजेच लोक आज घर खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेत आहेत; परंतु वाढत जाणाऱ्या 'ईएमआय'मुळे लोक या कर्जात फसत आहेत. रिअल इस्टेट आणि फायनॅन्शियल सेक्टरमधील जाणकारांच्या मते २०२६ च्या अर्थसंकल्पात सरकार काही महत्त्वाचे निर्णय घेण्याची शक्यता आहे. या निर्णयांमुळे घरासाठी घेतलेल्या कर्जाचा 'ईएमआय' कमी होऊ शकतो. यामुळे आर्थिक ताणही कमी होऊ शकतो. या वर्षाच्या अर्थसंकल्पात करसवलतीमध्ये वाढ केली जाण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. सध्या गृहकर्जावरील व्याजात दर वर्षी दोन लाख रुपयांपर्यंतची करसवलत मिळते. ही सवलत दोन लाखांवरून पाच लाख रुपये केली जाण्याची आशा व्यक्त केली जात आहे. हा निर्णय सत्यात उतरल्यास मध्यमवर्गीयांना मोठा फायदा होईल. आजघडीला घरांच्या किमती फारच वाढल्या आहेत; परंतु आजही गृहकर्जाबाबत आपल्याकडे जुन्याच करसवलती लागू आहेत. त्यामुळेच आज एखाद्याने गृहकर्ज घेतले, की त्याचा साधारण ४० ते ४५ टक्के पगार त्या गृहकर्जाचे 'ईएमआय' फेडण्यातच जातो. करसवलतीत वाढ झाल्यास संबंधित व्यक्तीचे वर्षाला ४० ते ७५ हजार रुपये वाचू शकतात.

# शिक्षकांना गुंतवलं जातंय सरकारी कामात

**सुयोग आंग्रे**

एक काळ असा होता की शिक्षकांना समाजाचे मार्गदर्शक मानले जायचे. आज व्यवस्थेतील प्रत्येक कमतरता पूर्ण करण्यासाठी तेच शिक्षक सर्वात सोयीचे साधन बनत आहेत. सुरक्षा, निगराणी आणि प्रशासकीय गरजांच्या नावाखाली त्याला अशी कामे करावी लागतात ज्याचा शिक्षणाशी प्रत्यक्ष संबंध नाही. अनेक वेळा शिक्षण व्यवस्थेत अपेक्षित बदल घडत असतात. याचे निश्चितच दूरगामी परिणाम होतील. अध्यापन हे अत्यंत जबाबदारीचे आणि सन्मानाचे काम मानले जाते. मात्र अशैक्षणिक कामांशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वे शिक्षकांच्या प्रतिष्ठेला न्याय देतात का? हा प्रश्न अधिक गंभीर होतो कारण ही पहिलीच वेळ नाही. याआधीही शिक्षकांना निवडणूक ड्युटी, जनगणना, पशुगणना, मतदार यादी पुनरिक्षण, पडताळणी, सर्वेक्षण, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम, कोविड निगराणी, सामाजिक मोहीम आणि इतर अनेक गैर-शैक्षणिक कामांमध्ये सातत्याने तैनात करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत शिक्षक हा आता प्रत्येक प्रशासकीय जबाबदारी पार पाडण्यासाठी सक्षम मानव संसाधन मानला जातो का, अशी चर्चा होणे स्वाभाविक आहे? सुरक्षितता आणि संवेदनशीलता यांसारख्या मुद्यांच्या आडून, जर शिक्षक त्याच्या मूळ कामापासून, म्हणजे अध्यापन, संशोधन, शैक्षणिक मार्गदर्शन इत्यादींपासून सतत दूर राहिला, तर त्याचा केवळ शिक्षकांवरच नव्हे, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर आणि समाजाच्या बौद्धिक भविष्यावर दीर्घकालीन परिणाम होईल. प्रश्न आता केवळ आदेशाच्या कायदेशीरपणाचा नाही, तर दृष्टिकोन आणि प्राधान्याचाही आहे. कोणत्याही राष्ट्रातील शिक्षकाच्या प्रतिष्ठेचा ऱ्हास हे त्या समाजाच्या आत्मभानाच्या अभावाचे लक्षण आहे. शिक्षकाची उपेक्षा हा कोणत्याही एका वर्गाचा अपमान नाही, तर ज्ञान, शहाणपण आणि प्रश्न विचारण्याची क्षमता समाजासाठी किती महत्त्वाची आहे, या विचाराची उपेक्षा आहे. शिक्षकाची व्यावसायिक ओळख पुसट करणारी अशी कामे आपण सतत शिक्षकाला करायला लावत असू, तर आपण नकळत शिक्षकालाच असंबद्ध बनवत आहोत की नाही, हे आत्मपरीक्षण करायला हवं! ज्या शिक्षकाकडून समाजाला विवेकी नागरिक तयार करण्याची अपेक्षा आहे, त्या शिक्षकाला आज अप्रत्यक्ष संदेश दिला जात आहे, की शिकवणे, संशोधन करणे, विचार आणि प्रश्नांची मांडणी करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आता प्राधान्याच्या यादीत नाही. वर्गात विद्यार्थी आहेत किंवा नसले तरी शिकवण्याचा दर्जा सतत का घसरत चालला आहे? संशोधन होत आहे की नाही यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे जिथे प्रशासकीय यंत्रणा आपले कोणतेही कार्य करण्यात अपयशी ठरते, तिथे त्याची भरपाई करण्यासाठी शिक्षकांना सहजपणे तैनात केले पाहिजे. ही परिस्थिती केवळ व्यावसायिक प्रतिष्ठेचे उल्लंघन करत नाही तर शिक्षणाला कमी महत्त्वाची क्रिया मानण्याची प्रवृत्ती देखील उघड करते. गंमत अशी की ज्या समाजात एकेकाळी शिक्षकाला गुरू, आचार्य आणि राष्ट्रनिर्माता म्हटले जायचे, त्याच समाजात त्याला कोणतेही अतिरिक्त प्रशिक्षण आणि योग्य मोबदला न घेता कोणतेही काम करून घेता येणारे बहुउद्देशीय सरकारी कर्मचारी मानले जाते. निवडणूक ड्युटी असो, सर्वेक्षण असो, तपासणी असो, पर्यवेक्षण असो वा पडताळणी असो, सर्वत्र शिक्षकांना पुढे केले जाते. शिक्षक हा ज्ञानाचा स्रोत नसून व्यवस्थेतील अपयशांना वाहून नेणारे एक आज्ञाधारक माध्यम आहे, असा विश्वास हळूहळू प्रस्थापित होत आहे. या दृष्टिकोनामध्ये, शिक्षकाची ओळख बौद्धिक भांडवल म्हणून नव्हे, तर संकट व्यवस्थापनासाठी सुलभ संसाधन म्हणून केली जात आहे. अत्यंत चिंतेची बाब म्हणजे या सततच्या अपमानानंतर शिक्षक समाजाचे मौन हाच प्रश्न निर्माण झाला आहे. विकसित देशांकडे पाहिले तर वेगळे चित्र दिसते. फिनलंडमध्ये शिक्षक बनणे ही केवळ नोकरी नाही तर सामाजिक प्रतिष्ठा आणि बौद्धिक जबाबदारीचे प्रतीक आहे. तिथे शिक्षकांना गैर-शैक्षणिक सरकारी कामात गुंतवणे जवळजवळ अशक्य मानले जाते, कारण तेथील राज्य हे समजते की शिक्षकांचा काळ थेट राष्ट्राच्या भविष्याशी जोडलेला आहे. त्याच वेळी, हे मान्य केले गेले आहे की एखाद्या शिक्षकाचा अपमान करणे हे दीर्घकालीन राष्ट्रासाठी धोक्याचे लक्षण आहे. शेवटी हा प्रश्न कोणत्याही एका आदेशापुरता, कोणत्याही फाईल किंवा कोणत्याही विभागापुरता मर्यादित नसून, एक राष्ट्र म्हणून आपण उभारत असलेल्या बौद्धिक आत्म्याचा प्रश्न आहे. जेव्हा शिक्षकाला त्याच्या मूळ धर्मापासून वंचित केले जाते आणि व्यवस्थेच्या अपयशाचे मूक वाहक बनवले जाते, तेव्हा शिक्षणाकडे केवळ दुर्लक्षच होत नाही, तर अज्ञानाला संस्थात्मक वैधताही मिळते. जिथे शिक्षक वर्गात काम करण्यापेक्षा रस्त्यावर काम करणे अधिक उपयुक्त मानले जाते असा समाज खरोखरच प्रगती करू शकतो का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**दिनविशेष**

# डॉ होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठाम पणे सांगितले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**लोकसंसद**

# हळदी कुंकू समारंभ – स्त्री प्रबोधनाचे व्यासपीठ व्हावे !

महापालिका निवडणुका संपन्न होऊन निकालही जाहीर झाले आहेत. काही ठिकाणी याआधीचेच नगरसेवक पुन्हा निवडून आले आहेत, तर काही ठिकाणी नागरिकांनी नवीन उमेदवारांना संधी दिली आहे. निवडून आल्यानंतर नागरिकांपर्यंत जाऊन कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांच्याशी जवळीक साधून त्यांचा विश्वास संपादन करणे हा विजयी उमेदवाराचा तसा ठरलेला कार्यक्रम असतो. यंदा हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने ही आयती संधी मिळाली आहे त्यामुळे काही नगरसेवकांनी आपल्या प्रभागात साजरे होणाऱ्या हळदी कुंकू समारंभाना भेटी दिल्या तर कांहींनी प्रभागातील महिलांसाठी स्वतःच भव्य दिव्य हळदी कुंकू समारंभाचे आयोजन केले. सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था यांच्या वतीनेही दरवर्षीप्रमाणे हळदी कुंकू कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. रथ सप्तामी पर्यंत हळदी कुंकू साजरा करण्याचा प्रघात असला तरी सार्वजनिक हळदी कुंकू समारंभ त्यांनतरही सुरु असतात. आयोजकांकडून स्त्रियांच्या मनोरंजनासाठी गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची, नाव घेण्याच्या स्पर्धा, होम मिनिस्टर यांसारखे खेळ ठेवले जात आहेत. रोजच्या दगदगीतून विरंगुळा म्हणून यासर्व गोष्टी ठीक वाटत असल्या तरी यातून मनोरंजनाखेरीज अन्य काहीच साध्य होत नाही हेही खरे. सध्याची सामाजिक स्थिती पाहता स्त्रियांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक चढतो आहे. ६ महिन्याच्या कोवळ्या बालिकेपासून ८० वर्षाच्या वयोवृद्धाही वासनांधांच्या बाली पडत आहेत. हल्लीचे चित्रपट आणि वेब सिरीज यांमध्ये खुलेआम दाखवली जाणारी अतिरंजित प्रणयदृश्ये, अनैतिक संबंधांना खतपाणी घालणारे कथानक, यांतील अभिनेत्रीचा तोकड्या कपड्यांतील मुक्त वावर, स्टाईल स्टेटमेंट म्हणून अभिनेत्रींकडून सहजपणे केले जाणारे मद्यपान आणि धूम्रपान, रात्री अपरात्री बार आणि पबमध्ये थिरकणे, एका बॉयफ्रेंडशी ब्रेकअप करून दुसरा बॉयफ्रेंड पकडणे, विवाहाआधी शारीरिक संबंध ठेवणे, पदोपदी शिव्यांचा स्वैर वापर या सर्वांचा परिणाम हल्लीच्या पिढीतील मुलींवर पडू लागला आहे. या सर्व गोष्टींप्रतीचे आकर्षण मुलींमध्ये वाढू लागले आहे. चित्रपटांतील अशा दृश्यांवर आणि प्रसंगांवर सेन्सॉर बोर्ड कात्री न लावता 'अ'प्रमाणपत्र(प्रौढांसाठी) देऊन आपली जबाबदारी झटकते आहे. वेब सीरिज तर सेन्सॉर बोर्डाच्या अखत्यारीतच येत नाही त्यामुळे आपल्या घरच्या मुलींना या सर्वांपासून दूर ठेवण्यासाठी त्यांच्यावर पुरेसा धाक ठेवणे आज पालकांचे कर्तव्य बनले आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे सध्याच्या मुली भारतीय संस्कृतीपासून दुरावू लागल्या आहेत. कपाळावर कुंकू किंवा टिकली लावणे, मनगटांत बांगड्या घालणे ओल्ड फॅशन वाटू लागले आहे. हल्ली तर गळ्यातले मंगळसूत्र हातात बांधण्याची फॅशन हळूहळू जोर धरू लागली आहे. आजमितीला वासनांधांच्या वखवखलेल्या नजरा चोहोबाजूंनी फिरत आहेत, हिंदूंचा वंशविच्छेद करू पाहणारे लव्ह जिहाद सारखे संकट प्रत्येक क्षेत्रात सावज शोधत आहे. अशावेळी स्त्रीशक्तीचा केवळ मनोरंजनामध्ये अपव्यय करण्याऐवजी स्त्रियांना सर्वार्थाने सक्षम होण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या कार्यक्रमाचे हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने आयोजन करणे काळाची गरज बनली आहे. हळदी कुंकू हा जसा स्त्रियांच्या संघटनशक्तीचा कार्यक्रम आहे तसा स्त्रीमधील शक्तीच्या पूजनाचा धार्मिक कार्यक्रमही आहे. स्त्रीच्या भ्रूमध्यावर हळद कुंकू लावणे म्हणजे स्त्रीमधील आदिशक्तीचे पूजन करणे. त्यामुळे या धार्मिक कार्यक्रमांमध्ये हिंदू धर्माची आणि प्राचीन अशा भारतीय संस्कृतीची महती सांगणारी व्याख्याने, धार्मिक कृतींचे महत्व सांगणारी प्रवचने आणि संकटकाळात स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ बनण्यास शिकविणारी स्वसंरक्षण प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके यांसारख्या उपयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करायला हवे, पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी गेल्यामुळे स्त्रियांचे होणारे नुकसान, भोगवादाचे दुष्परिणाम, भारतीय इतिहासात अजरामर झालेल्या पराक्रमी स्त्रियांची चरित्रे यांविषयी माहिती देणारी व्याख्याने यानिमित्ताने आयोजित केली जावीत. स्त्री ही साऱ्या कुटुंबाची जननी असते त्यामुळे त्या स्त्रीमध्ये जसे संस्कार असतील, तसेच ते पुढे निपजतील यासाठी स्त्रीने आपले दायित्व समजून घेऊन आपल्या पाल्यांवर तसे संस्कार करणे गरजेचे आहेत. हळदी कुंकू समारंभ अशा विचारांची देवाणघेवाण करणारे एक चांगले व्यासपीठ आहे त्याचा केवळ मनोरंजनासाठी अपव्यय होऊ नये.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२४ जानेवारी**

१) श्रीम. सुशीला मुकुंद जोशी अलिबाग, २४-१-१९४३
२) श्री. मनोहर दत्तात्रेय सुर्वे अलिबाग, २४-१-१९५१
३) श्री. श्रीरंग विठ्ठल परचुरे अलिबाग, २४-१-१९५७
४) श्री. प्रभाकर हरिश्चंद्र घरत सासवणे, अलिबाग २४-१-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सौ. मृदुला सचिन जोशी अलिबाग**

# रेल्वे मार्गावरील ताण वाढला

## प्रवाशांमध्ये वाढ; वेळापत्रक सुधारणा, सुरक्षेची मागणी तीव्र

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील उरण-नेरूळ-बेलापूर रेल्वे मार्गावर प्रवाशांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत २३ लाख प्रवाशांनी या मार्गावर प्रवास केला आहे. २०२४ मध्ये ही संख्या १९ लाख होती. त्यामुळे एका वर्षात सुमारे १२ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाच्या सूत्रांकडून मिळाली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू तसेच परिसरातील विविध विकास प्रकल्पांमुळे उरण, द्रोणागिरी, तारघर, गव्हाण व नेरूळ परिसरातून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करत आहेत. या वाढत्या प्रवासीसंख्येमुळे रेल्वे मार्गावरचा ताणही वाढला आहे. प्रवाशांची वाढ लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने डिसेंबर २०२५ पासून अप व डाऊन मार्गावर १० नवीन लोकल फेऱ्या सुरू केल्या असून, तरघर आणि गव्हाण स्थानकांवर लोकल थांबे देण्यात आले आहेत. मात्र सध्याचे वेळापत्रक प्रवाशांच्या गरजांना अपुरे ठरत असल्याचे चित्र आहे.

विशेषतः सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत लोकल फेऱ्या एक तासाच्या अंतराने असल्याने प्रवाशांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत आहे. दुपारच्या वेळेत बेलापूर-नेरूळ मार्गावर एक ते दीड तास लोकल न मिळाल्याने नोकरदार, विद्यार्थी व महिलांची मोठी गैरसोय होत आहे. याशिवाय रात्री १०.३० वाजता शेवटची लोकल असल्याने उशिरा प्रवास करणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, उरण परिसरातील रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या महागड्या वस्तूंची दमदाटी करून चोरीच्या घटना घडल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. गर्दीचा फायदा घेत मोबाईल, पर्स, दागिने आदी वस्तू चोरण्यात येत असून, रात्रीच्या वेळेत सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे.



### मराठी पत्रकार संघाकडून विविध मागण्या

उरण तालुका मराठी पत्रकार संघाने रेल्वे प्रशासनाकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. दुपारच्या वेळेत लोकल फेऱ्या अर्ध्या तासाच्या अंतराने सुरू कराव्यात, उरण स्थानकातून सीएसएमटी, ठाणे आणि पनवेलपर्यंत थेट वातानुकूलित लोकल सेवा लवकर सुरू करावी. तसेच, नवी मुंबई ते उरण दरम्यानच्या सर्व रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## गजेंद्र पाटील यांचे निधन

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील तरुण गजेंद्र सुभाष पाटील उर्फ बाबीनाथ यांचे बुधवारी (दि.२१) हृदय विकाराने निधन झाले.



निधनासमयी ते ५० वर्षांचे होते. त्यांच्यावर दुपारी ३ वाजता वाघ्रण स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले, आई असा परिवार आहे. त्यांचे दिवस कार्य दि.३० जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली.

# खोकरी घुमट येथे ऑडिओ गाईड सुविधा

### पुरातत्व विभागाचा अभिनव उपक्रम

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध ऐतिहासिक गोल घुमट येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना इतिहासाची माहिती मिळावी, यासाठी पुरातत्व विभागाने अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पर्यटकांसाठी क्युआर कोड मोबाईलवर स्कॅन करून ऑडिओ गाईडची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. अशी माहिती पुरातत्व विभागाचे साहाय्यक संवर्धक प्रकाश घुगरे यांनी दिली.

मुरूड तालुक्यात राजपुरी ग्रामपंचात हद्दीत ऐतिहासिक खोकरीचे गुंबज गोल घुमट आहेत. या नवाबकालीन ऐतिहासिक वारसा स्थळाला दरवर्षी हजारो पर्यटक भेट देत असतात. मात्र गाईड उपलब्ध नसल्याने त्यांना या वारसा स्थळाची अचून माहिती उपलब्ध होऊ शकत नव्हती. पुरातत्व विभागाच्या माहिती फलकांवर उपलब्ध माहितीच या पर्यटकांना मिळत होती. ही बाब लक्षात घेऊन पुरातत्व विभागाने खोकरीचे घुमट येथे आता ऑडीओ गाईड सुविधा उपलब्ध करून दिली आहे.




त्यामुळे मुरुड जंजिरा किल्ल्यापाठोपाठ आता खोकरी घुमटांची माहिती ऑडीओ गाईड स्वरुपात उपलब्ध झाली आहे. क्यूआर कोड स्कॅन करून ही सुविधा येणार सर्व पर्यटकांना उपलब्ध होणार आहे. नुकताच या सुविधेचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी खोकरी गुंबड ई-वॉक ऑडिओ गाईडचे उपअधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. ए.व्ही. नागानूर, सहाय्यक अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ शेख मुहिब, संवर्धन पुरातत्व शास्त्रज्ञ राजेश दिवेकर, संशोधन सहाय्यक किन्नरी पोलाडिया, पुरातत्व सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर, पुरातत्व बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यावेळी उपस्थित होते.

## मालती गायकर यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील आमटेम गावातील रहिवासी मालती हिरामण गायकर (६२) यांचे सोमवारी (दि.१९) निधन झाले. कळंबोली (नवी मुंबई) येथील एम.जी.एम. रुग्णालयात अल्पशा आजाराने उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली. मालती गायकर यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी आमटेम येथील वैकुंठ स्मशानभूमीत



अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गायकर यांचे नातेवाईक, आप्तेष्ट, सगेसोयरे, मित्रपरिवार तसेच आमटेम गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मालती गायकर यांच्या पश्चात पती हिरामण गायकर, किशोर, गोकुळ, रोशन, चेतन हे चार विवाहित मुलगे, सुना, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि. २८ जानेवारी रोजी उद्धर येथे, तर उत्तरकार्य शनिवार दि.३१ जानेवारी रोजी आमटेम येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती गायकर परिवाराकडून देण्यात आली.

## बोरीपाखाडी येथे बायोचारनिर्मिती प्रशिक्षण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने उरण बोरीपाखाडी या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी मंगळवारी (दि.२०) बायोचारनिर्मिती आणि वापराबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह तालुका कृषी अधिकारी आर.टी. नारनवर, मंडळ कृषी अधिकारी एस.डी. गटकळ, उपकृषी अधिकारी ए.डी. बुरकुल, नैसर्गिक शेती मिशनचे उपाध्यक्ष हेमंत पाटील, सचिव रवींद्र काठे, शेतकरी कमळाकर थळी, सहाय्यक कृषी अधिकारी ए.आर. राठोड, आर.पी.भजनावले, ए.एस. पानसरे तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी बायोचार म्हणजे काय, याची सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढत असल्याचे सांगण्यात आले.



## वरदविनायक मंदिरात गणेश जन्मोत्सव साजरा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

अष्टविनायकापैकी श्री क्षेत्र महड येथील वरदविनायक मंदीरात गुरूवारी (दि.२२) गणेश जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केल्याने मंदीर परिसरात यात्रेचे स्वरूप आले होते. मंदीराच्या गाभाऱ्यात अष्टविनायकांची रांगोली साकारली होती. या दिवशी भजन, गायन, भक्ती संध्या, तर रविवारी भजनांसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गणेश जन्मोत्सवाला सकाळी ८ वाजता श्रींची महापूजा झाली. सायंकाळी भजनासह रात्री पैठणीचा कार्यक्रम रंगला. चारूदत्त आफळे बुवा यांच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता झाली. नवस फेडणाऱ्यांनीही गर्दी केली होती. आलेल्या भक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी चोख व्यवस्था तर ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वाहन व्यवस्था तसेच महाप्रसादाची सोय वरदविनायक देवस्थान संस्थानाकडून करण्यात आली होती.

## देवगड समुद्रात कर्नाटकी नौका जप्त

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

देवगड सागरी हद्दीत अनधिकृतपणे मासेमारी करणाऱ्या परप्रांतीय नौकेवर मत्स्यव्यवसाय विभागाकडून कारवाई करण्यात आली. देवगड समुद्रात गस्त घालत असताना कर्नाटक राज्यातील 'हनुमा वैभवा' ही नौका अवैध ट्रॉलिंग करताना आढळून आली. देवगड परवाना अधिकारी किरण वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील पथक गस्तीवर असताना, समुद्रकिनारी १६ ते १८ वावा खोलीवर ही नौका मासेमारी करताना आढळली. गस्ती नौकेला पाहताच कर्नाटकच्या नौकेने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून तिला ताब्यात घेतले. या नौकेकडे महाराष्ट्राच्या हद्दीत मासेमारी करण्याचा कोणताही वैध परवाना नव्हता. नौकेवर तांडेलसह सात खलाशी होते. त्यांनादेखील ताब्यात घेण्यात आले असून नौका देवगड बंदरात आणण्यात आली. देवगड पथकाची परप्रांतीय नौकांवरील ही चौथी, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण दहावी मोठी कारवाई आहे.

## रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा येथील जी. एम. वेदक विज्ञान महाविद्यालय येथे गुरुवारी (दि.२२) राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रस्ता सुरक्षा विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक सूर्यकांत गंभीर व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सूर्यकांत गंभीर यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे महत्त्व, वाहतूक नियमांचे पालन, अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच सुरक्षित वाहन चालविण्याबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन करून जबाबदार नागरिक होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. नसरीन शेख यांनी केली. या कार्यक्रमाला संस्थेचे मा.अध्यक्ष डॉ.नंदकुमारजी वेदक, उमेशजी वेदक तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे व डॉ. नानासाहेब यादव यांचेही प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.




**पाच्छापूर परिसरात रात्रीची गस्त वाढवली** | **सतर्क राहण्याचे वनविभागाकडून आवाहन**

# सुधागडमध्ये बिबट्याबाबत जनजागृती

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्या आणि त्याच्या पिल्लांच्या दर्शनामुळे दहशत पसरली आहे. ही दहशत पाहता, वनविभागाने आता ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात रात्रीची गस्त वाढवण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी जनजागृतीचे फलक लावण्यात येत आहेत. याबरोबर समाज माध्यमांवर व व्हाट्सअप ग्रुपवर शेअर केले जात आहेत.




पाच्छापूरसह आजूबाजूच्या आसानवाडी, पोटलज आणि धोंडसे या गावांमध्ये बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. याची दखल घेत वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी देऊन पगमार्क्सची पाहणी केली आहे. तसेच, बिबट्याशी आमनासामना झाल्यास काय करावे, याबद्दल ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. गावातील मुख्य चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी माहितीपर फलक लावून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात अनेक भागात मानवी वस्तीमध्ये बिबट्याचा वावर वाढला आहे. सुधागड तालुक्यामध्ये देखील बिबट्यासह पिल्लांच्या दर्शनामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वनविभागाने स्थानिकांच्या मदतीने पुढाकार घेत जनजागृती सुरू केली आहे. या जनजागृतीतून नागरिकांमध्ये असणारी भीती दूर करण्याचा प्रयत्न होत असताना बिबट्यापासून संरक्षण कसे करायचे, याबाबत जागृती करण्यात आली आहे.

### नागरीकांसाठी सुचवलेल्या उपाययोजना

रात्री किंवा पहाटे घराबाहेर पडणे टाळा. अत्यावश्यक असल्यास हातात काठी आणि टॉर्च घेऊन किमान ३-४ जणांच्या समूहाने बाहेर पडा. जंगलातून किंवा शेतातून चालताना मोठ्याने बोलत जा किंवा मोबाईलवर गाणी लावा, जेणेकरून आवाजाने बिबट्या लांब निघून जाईल. लहान मुलांना घराबाहेर एकटे सोडू नका. रात्रीच्या वेळी दरवाजे घट्ट लावून घ्या. उघड्यावर शौचास जाऊ नका. बंदिस्त शौचालयाचा वापर करा. गोठे चहूबाजूंनी बंदिस्त असावेत. कुत्र्यांना साखळीने बांधून ठेवू नका, कारण बिबट्या कुत्र्यांच्या शिकारीसाठी लोकवस्तीत येतो. घराभोवतालचे गवत आणि झुडपे काढून परिसर स्वच्छ ठेवा, जेणेकरून बिबट्याला लपायला जागा मिळणार नाही.

> पाच्छापूर परिसरात बिबट्याचा वावर लक्षात घेता रात्रीची गस्त वाढवली आहे. लोकांमध्ये जनजागृती करत आहोत. नागरिकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. वनविभागाचे कर्मचारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. ग्रामस्थांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा. आम्ही ग्रामस्थांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे कटिबद्ध आहोत.
>
> **– विशाल सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी, सुधागड–पाली**

# निवडक




## नामफलकाचे अनावरण

**उरण :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधत उरण येथे शिवसेनाप्रणित 'शिवतेज व्यापारी असोसिएशन'च्या नामफलकाचे अनावरण माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. उरण शहरातील व्यापाऱ्यांच्या हक्कांसाठी, एकजुटीसाठी आणि स्वाभिमानासाठी स्थापन करण्यात आलेल्या या नव्या व्यापारी संघटनेचा नामफलक अनावरण सोहळा शुक्रवारी (दि.२३) सकाळी ११ वाजता, उरण येथील राम मंदिर, राजपाल नाका येथे पार पडला. व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच उरणमधील व्यापारी वर्गाला संघटित ताकद देण्यासाठी शिवतेज व्यापारी असोसिएशनची स्थापना करण्यात आली. यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, परमानंद करगुटकर, संपर्कप्रमुख दीपक भोईर, शेकाप ज्येष्ठ नेते काका पाटील, नगरसेवक विक्रांत म्हात्रे, कासारे, वंदना पवार, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, सूर्यकांत दरने, महेश वर्तक, अप्पा पाठारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अखंड दासबोध सप्ताह साजरा

**नागोठणे :** नागोठण्याजवळील आमडोशी येथे परमपूज्य मोक्ष दास दाते राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु ताईसाहेब महाराज यांची १२७वी जयंती व अखंड दासबोध सप्ताह साजरा करण्यात आला. गुरुवर्य श्री अनंत महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बुधवार दि.२१ ते शुक्रवार दि.२३ जानेवारी दरम्यान हा सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात बुधवार दि.२१ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता माऊलींची पाद्यपुजा व अखंड दासबोध नाम सप्ताहाने झाली. त्यानंतर दररोज काकड आरती व ध्यान, माऊलींची पाद्यपुजा, दासबोध वाचन, सकाळचे भजन, मान्यवरांची प्रवचने, माऊलींची आरती, हरिपाठ, भजन, रात्री कीर्तन, जागर आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन तीन दिवस करण्यात आले होते. गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी सायं. आमडोशी गावात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यात गुरुभक्त व ग्रामस्थ सहभागी झाले होते. त्यानंतर शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी सकाळी श्री ताईसाहेब महाराज पंचामृत अभिषेक सोहोळा, दासबोध वाचन, मान्यवरांचे प्रवचन, माऊलींची आरती झाल्यानंतर दुपारी १२ वाजता माऊलींवर पुष्पवृष्टी केल्यानंतर या दासबोध सप्ताहाची सांगता झाली.



## महेंद्र घरत यांचा सन्मान

**चिरनेर :** समाजभान जपणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या समाजकार्याच्या सेवेबद्दल त्यांना आगरी समाज भूषण पुरस्काराने कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने नुकतेच सन्मानित करण्यात आले. या अनुषंगाने महेंद्र घरत यांना एम. जी. ग्रुपच्या वतीने शुक्रवारी (दि.२३) शेलघर येथील सुखकर्ता बंगल्यावर त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन देऊन गौरविण्यात आले. यावेळी एम.जी. ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सुरक्षारक्षक दलाच्या परेडची रंगीत तालीम

**पनवेल :** २६ जानेवारी रोजी देशाचा प्रजासत्ताक दिन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने नेहमीप्रमाणे भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी रंगीत तालीम उत्साहात पार पडली. राष्ट्रीय ध्वजारोहणानंतर होणाऱ्या महाराष्ट्र सुरक्षा बल, पनवेल महापालिका अग्निशमन दल तसेच महाराष्ट्र सुरक्षारक्षक दलाच्या परेडसाठी ही रंगीत तालीम घेण्यात आली. शिस्तबद्ध पावले, एकसंध संचलन आणि आदेशांचे अचूक पालन यामुळे मैदानावर राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. या तालीमीत यावर्षी विशेष टू-व्हिलर प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सज्ज असलेल्या दलांचे कौशल्य, चपळता आणि समन्वय याचे प्रभावी दर्शन यावेळी घडले. आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने ही प्रात्यक्षिके महत्त्वाची ठरली. २६ जानेवारी रोजी होणाऱ्या मुख्य सोहळ्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. शिस्त, सेवा आणि समर्पण या त्रिसूत्रीचा प्रत्यय देणारी ही रंगीत तालीम पाहण्यासाठी अनेक नागरिकांनी उपस्थिती लावली होती. आता सर्वांना वेध लागले आहेत त्या क्षणाचे, जेव्हा राष्ट्रीय ध्वज फडकताना पनवेल पुन्हा एकदा देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघेल.

## पारंपरिक पद्धतीने गणेश जयंती साजरी

**नागोठणे :** नागोठण्यातील चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजातर्फे समाजाच्या श्री सिद्धिविनायक मंदिरात माघी गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन हे मंदिर विश्वस्त मंडळ यांनी व समस्त समाज बांधव व भगिनींमार्फत करण्यात आले होते. यावेळी शहरातील उपस्थित मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. या उत्सवात भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी झाले होते. श्रींच्या प्रसाद सेवेकरता समाजातील महिला वर्गाचा आणि शहरातील श्रद्धेय भाविकांचा भरघोस हातभार लाभला. सायंकाळी पालखी प्रदक्षिणा झाल्यावर महाआरतीने व प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याचबरोबर नागोठण्याजवळील वरवठणे गावातही गणेशगल्ली आळीमध्ये असलेल्या गणपती मंदिरात माघी गणेश जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.

# ‘विद्यार्थ्यांनी कौशल्यावर आधारित गुणवत्ता संपादन करावी’

। अलिबाग । प्रतिनिधी।

स्पर्धा विश्व अकॅडमी या ठिकाणी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील युवक- युवतीसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन व मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन स्वयंसिध्दा संस्था संचलित स्पर्धा विश्व अकॅडमी व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी किशन गंगा नारायणराव जावळे हे उपस्थित होते. गायिका ॲड. कला पाटील, किरण करंदीकर, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका तथा स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी आदी मान्यवर व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तपस्वी गोंधळी करीत असताना त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याकरिता आपल्या परिसरामध्ये कशाप्रकारे अकॅडमीची स्थापना केली.आज या अकॅडमीच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी सरकारी नोकरी प्राप्त करून लोकसेवा देत आहेत असे त्यांनी याप्रसंगी उपस्थिताना सांगितले.

प्रमुख मार्गदर्शक जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळेचे उत्तम नियोजन केले पाहिजे, सकारात्मक असणे गरजेचे आहे, चांगली संगत महत्त्वाची आहे, स्पर्धा परीक्षांबरोबर इतरही रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित उपक्रम शिकून घेतले पाहिजेत. स्वप्न मोठी पहा, स्वप्न पूर्ण होत नाहीत तो पर्यंत त्यांचा पाठपुरावा करणे याच्यातूनच यश प्राप्त होते. हे सांगताना त्यांनी त्यांचा प्रवास देखील सांगितला. डिटर्मिनेशन, कन्सिस्टन्सी ध्येय साध्य करताना फार महत्त्वाचे ठरतात असे त्यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांबरोबरच आपला प्लॅन बी देखील तयार ठेवा जेणेकरून अपयश आले तर खचून न जाता आपण दुसऱ्या प्लॅनवर काम करून यशस्वी होऊ शकतो. आधुनिक युग हे स्पर्धेचे युग आहे, असे त्यांनी सांगितले.


## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
### उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१
### पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना
**शुध्दीपत्रक**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या प्रस्तावति महाराष्ट्र राज्याच्या रायगड जिल्हयातील पागोटे (किमी ०.१००) ते चौक (किमी. २९.३१९) पर्यंत राष्ट्रीय महामार्ग – ३४८ ब (ग्रीनफिल्ड) चा प्रस्तावित ६- पदरी प्रवेश नियंत्रित विभाग प्रकल्पाबाबतची दिनांक ३०.०१.२०२६ रोजी, दुपारी ०१.०० वाजता आयोजित केलेली पर्यावरणविषयक जाहीर सुनावणी मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग यांच्या दिनांक २३.०१.२०२६ रोजीच्या आदेशानुसार, सदरील जनुसनावणी हि **दि. १६.०२.२०२६ रोजी, दुपारी ३.०० वाजता, स्थळ – आदय क्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके नाटयगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल, जि. रायगड– ४१०२०६** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी पूर्वी प्रसिध्दीनुसार वृत्तपत्रामध्ये (दि. २४.१२.२०२५, लोकमत, कृषिवल, इंडियन एक्सप्रेस) याबाबत कळविण्यात आले असून सदर जनसुनावणी वरील प्रमाणे घेण्यात येणार असून त्याबाबतचा खूलासा प्रसिध्दीसाठी जाहिर करण्यात येत आहे व याची नोंद घेण्यात यावी.

सही/–
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड–१



## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम )
**रोजगार अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड द्वारे वॉक इन इंटरव्ह्यूच्या माध्यमातून वैद्यकीय विभागात करार तत्त्वावर बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (एमपीएचडब्ल्यू) पदासाठी अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/1सी/2026, दि. 21.01.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

**अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/1सी/2026, 21.01.2026**

| क्र. सं. | पदाचे नाव/ ग्रेड | यूआर | ईडब्ल्यूएस | ओबीसी | एससी | एसटी | पदांची एकूण संख्या | मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (एमपीएचडब्ल्यू) | 5 | 0 | 1 | 0 | 0 | 6 | 03.02.2026 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ **www.konkanrailway.com** वर लिंक → नियुक्ती → वर्तमान अधिसूचना पहावी व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**



## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 23/01/2026**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - एसआर. आरईएन/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत किमी 00/800 ते किमी 378/100 दरम्यान चिपळूण बॅलास्ट डेपो येथे बॅलास्टचा पुरवठा, केआरसीएल हॉपरमध्ये लोडिंग, अनलोडिंग, बॅलास्ट पसरविणे व बॉक्सिंग करण्याचे काम. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-03, अंदाजित खर्च:** ₹115,00,470/-, **ईएमडी** ₹2,07,500/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 16/02/2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.अजीज अहमद मुर्तुजा हुसेन खान यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत त्याचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.राजु परसराम वजिराणी व इतर | ९३ | २ | १६-२०-०० | १६२-०० |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. २३/०१/२०२६

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस-शॉप नं.३८, पहीला मजला, बी-विंग, तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो.८०८७७७०५२५/९०११५००२३५


# वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार जनजागृती

। उरण । प्रतिनिधी।

राष्ट्रीयमतदारदिनानिमित्तानेरयत शिक्षणसंस्थेच्यावीरवाजेकरकॉलेज, फुंडे येथे मतदार जनजागृती भित्तीपत्रकचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी आविषकुमार सोनोने ह्यांच्या हस्ते करण्यात आले. सदर भित्तीपत्रक इलेक्ट्रोल लिटरसी क्लब व राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केले होते.

याप्रसंगी तहसीलदार उद्धव कदम यांनी मतदानाची शपथ वाचून नव मतदार विद्यार्थ्यांनाही शपथ दिली. या रॅलीत उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी आविष कुमार सोनोने, तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. उद्धव कदम, नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, प्रा. राम गोसावी, डॉ. राजकुमार कांबळे, डॉ संदीप घोडके, उपप्राचार्य गजानन चव्हाण, डॉक्टर चिंतामण दिंधळे, प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. सुजाता पाटील, प्रा. भूषण ठाकूर, प्रा.प्रांजल भोईरयांनी सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. एनएसएस,एनसीसी व डीएलएलईच्या २१० विद्यार्थ्यांनी रॅलीत सक्रिय सहभाग घेतला. सदरच्या रॅलीत विद्यार्थी सहभागी झाले मतदार जागृतीचा संदेश प्रसारित केला. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने अशा जागृती उपक्रमांद्वारे लोकशाहीतील सहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.


दिनांक : २४ जानेवारी २०२६
### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतींसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड, राज्य महाराष्ट्र येथील जमीन मिळकती:-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| राजेंद्र बाळु पाटील व इतर ३९ | १७ | ४ | ०-२४-९० | ०१ | ३० |
| | १७ | ६ | ०-०२-०० | ०० | ०५ |
| | १७ | ७ | ०-०५-०० | ०० | ०५ |
| | १८ | ७अ | ०-१६-४० | १ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-२०३ व २०४, साईधाम दुसरा मजला, अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सही / -
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- २४/०१/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१



### जाहीर नोटीस

**पेण येथील मे. तहसिलदार पेण यांचे कोर्टात कुळ कायदा कलम ७० ब अन्वये**

कु.का.क. ७०ब फे.चौ.दा.क्र. ०३/२०२५

१.श्री.एकनाथ परशुराम पाटील
रा.कळवे, पो.जोहे. ता.पेण,जि.रायगड — अर्जदार

विरूद्ध

१.श्री.हरिभाऊ गजानन पिसाट
२.श्रीम.सरस्वतीबाई गजानन पिसाट — सामनेवाला
वरील १ ते २ रा.कळवे, पो.जोहे, ता.पेण,जि.रायगड

तमाम जनतेस कळविण्यांत येते आहे की, अर्जदार श्री.एकनाथ परशुराम पाटील, रा.कळवे, पो. जोहे, ता.पेण, जि.रायगड यांनी पेण येथील मे. तहसिलदार पेण यांच्या कोर्टात खालील वर्णन केलेल्या मिळकतीची कुळ कायदा कलम ७० ब दावा फेरचौकशी प्र.क्र.०३/२०२५ अन्वये कुळ म्हणून नाव दाखल होणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

जिल्हा व तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण तसेच तलाठी सजा सोनखार यांचे हद्दीतील अर्जदार यांची मिळकत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू .पै. |
|---|---|---|---|---|
| कळवे | १० | १/अ/२ | ०-०७-१० पैकी ०-०४-०० | ०.९० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे कुळ कायदा कलम ७० ब खालील दाव्याचे संदर्भात सामनेवाला यांस नोटीसा काढण्यांत आलेल्या आहेत. सामनेवाले तसेच अनुसूचित निर्दीष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस अर्जदार हे वरील मिळकतीस कुळ असल्याबाबत/नसल्याबाबत हरकत घेण्याची झाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांत लेखी हरकत मा. तहसिलदार पेण यांच्या समोर प्रत्यक्ष हजर राहून अथवा वकीलामार्फत दाखल करावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी चालवून कोर्ट निकाल देऊ शकते. याची समज घ्यावी.

ठिकाण :- पेण
दिनांक :- २४/०१/२०२६

Signed by
Tanaji Siddheshwar Shejal
Date: 10-01-2025 11:05:39
**(तानाजी शेजाळ)**
**तहसिलदार पेण**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-पाबळ, ता-पेण, जि-रायगड, येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये एकूण क्षेत्रास दिलिपकुमार घेवरचंद मोहता, यांचे नाव नमुद असून सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काने व ताबेकब्जाने असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे आशिल प्रियंका अक्षय पाटील, वगैरे रा-वडगाव-वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड, यांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे, तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करुन घेण्याकरीता आमचे आशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पाबळ, ता-पेण, जि-रायगड.**

| मौजे | गट विभाग/ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| पाबळ | १३ | ०-१५-०० पो.ख.०-०३-०० एकूण क्षेत्र ०-१८-०० | ०.२० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमुद केलेली सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु, वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबध असल्यास या व्यक्तींनी या संबधितानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी, कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तधर, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबध नाही, असे समजण्यात येईल, त्यानंतर आलेल्या तधरी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहित धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पेण
दिनांक : २४/०१/२०२६

सही
**(रसिक विश्वनाथ कोठेकर)**
वकिल
पत्ताः- शशिविश्व बंगलो, म्हाडा वसाहत, प्लॉट नं.८, ता.पेण, जि.रायगड.
मोबा.नं.९५६१९१९१११



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे - आकुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**:: मिळकतीचे वर्णन ::**
**मौजे - आकुर्ले, ता. कर्जत, जि.- रायगड**

| जमिन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वैभव रमाकांत पितळे<br>सचिन रमाकांत पितळे<br>मेघराज राजेश पितळे<br>युमिका राजेश पितळे | ५२/२/अ | ०-१९-१० | १.३१ |

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत मरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २१/०१/२०२६

**सुवर्णा म.वत्सराज**
ॲडव्होकेट व नोटरी, पनवेल
पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. ३०४, आदित्य विहार सोसायटी, महात्मा फुले रोड, ता.पनवेल,जि.रायगड. ४१० २०६, फोन ९८३३६३९०४१



दिनांक २३/०१/२०२६
### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल श्रीमती. मार्किना मोरनाल यांनी मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील.

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री.तेजिंदरकौर | २९/४ | ०-१७-२१ | ०-६५ |
| अवतारसिंग सेठी | २९/११ | ०-०२-२८ | ०-०२ |
| | २९/२ | ०-००-६५ | ०-०३ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्ट, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल करावयात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ९२७१८७६०५०



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.महेंद्र भरत चौधरी यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २४ | २/ब | ०-६०-०० पैकी खरेदी करणेचे क्षेत्र ०-३०-०० | - |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. २४/०१/२०२६.

**ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
पत्ता - प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर, मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड पिनकोड नं. ४१०२०१
फोन नं. ९४२२०६८७५५



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रविंद्र दौलत म्हसे | २७ | ३ | ०-५९-०० | ० | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २४/०१/२०२६



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, तिचे विद्यमान कब्जेदार/मालक श्री. संतोष जनार्दन काळसेकर यांच्याकडून आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | ६३/अ/३ | ०-१३-०० | २.५४ |
| | | ०-११-१० | |
| | | ०-२४-१० | |
| | | पो.ख. ०-०३-९० | |
| | | ०-२८-०० | |

सदर मिळकतीपैकी पश्चिम दिशेकडील ० हे. १२ आर एवढी मिळकत

सबब सदरच्या मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, तबदील, ट्रस्ट, वारसाहक्क, विक्रीचा करार, तांबा, इजमेंटरी हक्क यांप्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास संबंधितांनी अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत आपापल्या हरकती खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत आणून द्याव्यात पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची, कसलीही हरकत अथवा पोस्टाने अगर तक्रार आली नाही तर, सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची, प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील, बोजारहीत आणि खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती आणि तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्व लोकांस कळावे.

ता. २४/०१/२०२६

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी-३०१, ‘क्लिफ हेवन’ को. ऑप. हा. सोसायटी, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला, कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०१ २०१.



**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहीला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID: arcsalibag@gmail.com

जा.क्र. सनिअ/वि.१/का.क.१०१/जनसेवा पत/जाहीर नोटीस २०२५ दिनांक:-२२/०१/२०२६

**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि.रायगड यांचे समोर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये अर्ज.**

जनसेवा सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग यांनी दि २५/११/२०२५ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरमासमोर केलेला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब (४) च्या तरतुदिस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे आणि नियम ८६ ब नुसार सर्वप्रतिवादीना नोटीस दि.२३/१२/२०२५ व दि.०६/०१/२०२६ रोजी नोंदणीकृत डाक देय पोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती परंतु दि २३/१२/२०२५ व दि ०६/०१/२०२६ रोजी सुनावणीस आपण हजर राहिले नाही. त्यानुसार खालील कर्जदार व जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली जाहिर नोटीसद्वारे आपले म्हणणे दाखल करण्यासाठी संधी देण्यात येत आहे. तसेच अर्जदाराने जाहिर नोटीस देण्याचे विनंती केली आहे.

खालील यादीतील कर्जदार व जामिनदार यांना जाहिर नोटीस देण्यात येते की, दि ०२/०२/२०२६ दिवसाचे दुपारी १२ वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, कांग्रेसभुवन इमारत पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता.अलिबाग, जि.रायगड, पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहिर केलेचे दिवसापासून १० दिवसाचे आत प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिल्यास किंवा बचाव करण्याचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केल्यास अर्जदाराने अर्जा केलेती अभिकथने आपण स्वीकारली आहे असे गृहीत धरुन अर्जाची चौकशी करुन, अर्ज सदर नियमान्वये एक तर्फे निकालात करण्यात येईल.

| अ. क्र | कर्जदाराचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्र | दावा रक्कम | जामिनदार क्र १ | जामिनदार क्र.२ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सुंदराबाई बा.भगत व सौ संगिता के. बानकर | २५/११/२०२५ | १८२/२५ | ३१,८२,९८१ | श्री गोकुळ हरिदास कोळी | सौ आरती मनिष हार्ड |
| २ | सौ आरती मनिष हाडे | २५/११/२०२५ | २८५/२५ | १८,९९,८१७ | श्री सुधाकर माया हार्डे | श्री अंकेत भगवान बानकर |
| ३ | श्री प्रकाश दत्ताराम कोळी | २५/११/२०२५ | १८१/२५ | ४४,०३,४३२ | श्री अंकलेश सुधाकर भोईर | श्री राकेश गणेश म्हात्रे |
| ४ | श्री गजानन लक्ष्मण कोळी | २५/११/२०२५ | १८७/२५ | ३९,५३,१५३ | श्री दिपक हरिश्चंद्र कोळी | श्री निलेश लक्ष्मण कोळी |

१. अर्जदार यांनी जाब देणार १ ते ४ यांचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.
२. या अर्जाच्या सुनावणीच्या दरम्यान अर्जदाराच्या असे निर्दशनास आले की, कर्जदार क्र. १ ते ४ व त्यांचे जमीनदार क्र. १ व २ हे सुनावणीस गैरहजर राहिले. त्यामुळे कर्जदार क्र.१ ते ४ व त्यांचे जमीनदार क्र.१ व २ यांचेविरुद्ध जाहिर नोटीस देणे आवश्यक आहे असे अर्जदार संस्थेचे म्हणणे आहे व तसा अर्ज अर्जदार संस्थेतर्फे सौ.अमृता पारसनिस यांनी केला आहे.
३. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे ८६ व (४) नुसार कर्जदार क्र १ ते ४ व त्यांचे जामिनदार क्र. १ व २ यांना स्थानिक वर्तमानपत्रात नोटीस प्रसिद्ध करावी व त्यांस होणारा खर्च हा जाब देणारा करेल.

दिनांक २२/०१/२०२६
स्थळ : अलिबाग

**(अनिल पवार)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**



## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- आवश्यक : सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदार आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान: नागाव, संपर्क : ९८२०४४४८११ बैठकीची तारीख २४ ते ३१ जानेवारी २०२६ सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- For Sale House of Mrs Megha Shende Plot No. 446, S.No.252, MHADA COLONY, PEN-402107 Near Goa Highway Plot Area: 104 sq mtr Construction : Stilt + 2 floors (total construction area 1040 Sq feet) House Name : "KRISHNA- PRABHA" Contact : 9167791556
- दिशा पॅथॉलॉजी लॅब –रेवदंडा व चौंढी येथील कलेक्शन सेंटरसाठी ब्लड कलेक्शन टेक्निशियन /नर्स/फ्लेबोटॉमिस्ट (अनुभवी)/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६९५१९

जाहितातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातींचे उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिन्यांचे नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : नोकरीत अडचणी निर्माण होतील. प्रवासात प्रकृतीची काळजी घ्या. गैरसमजातून भांडणतंटा संभवतो.
- **वृषभ** : व्यवसायात मोठी प्राप्ती होईल. प्रकृतीच्या तक्रारी वाढतील. कायदेशीर बाबतीत पुरेशी काळजी घ्या.
- **मिथुन** : शुभयोगाचा उत्तम प्रभाव राहील. मुलांच्या प्रश्नात समाधान लाभेल. मान–सन्मानाचे योग आहेत.
- **कर्क** : ओळखी, मध्यस्थीतून लाभ होईल. भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. वाहन जपून वापरावं.
- **सिंह** : नोकरी–व्यवसायात समाधान लाभेल. महत्त्वाचे करार मार्गी लागतील. शैक्षणिक क्षेत्रात वाव मिळेल.ह्नह्न
- **कन्या** : मुलाखतीत यश मिळेल. आई–वडिलांबाबत चिंता राहील. नोकरीत बदली–बढतीचे प्रयत्न होतील.
- **तूळ** : व्यवसायात येणी वसुल होतील. मित्रांशी वाद–विवाद टाळावेत. स्पर्धांमध्ये उत्तम यश प्राप्त होईल.
- **वृश्चिक** : नोकरीत महत्त्वाच्या संधी चालून येतील. कौटुंबिक सौख्य लाभेल. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल.
- **धनु** : वास्तुबाबतच्या समस्यांमधून मार्ग निघेल. प्रेम प्रकरणात अनुकुलता लाभेल. खर्च विचारपूर्वक करावा.
- **मकर** : नोकरीत बदलाचा विचार होईल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. स्थापत्य क्षेत्रात प्रगती करता येईल.
- **कुंभ** : थोरामोठ्यांच्या गाठीभेटी होतील. मुलांना उत्कर्षाच्या संधी लाभतील. ताण–तणावापासून दूर रहावं.
- **मीन** : मनासारख्या घटना घडतील. कर्जाची परतफेड शक्य होईल. मुलांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला हवं.

## दिनविशेष

### २४ जानेवारी

१९५० : ‘जन–गण–मन’ या गीतास राष्ट्रगीत म्हणून मान्यता.
१९६६ : भीषण विमान दुर्घटनेत अणुशास्त्रज्ञ होमी भाभा यांचे निधन.
२०१३ : दहशतवादी हेडलीला ३५ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा.
२०१४ : खलिस्तानवादी दहशतवादी देविंदरपालसिंग भुल्लर याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय फेरविचार करणार असल्याची माहिती.
२०१६ : सत्तारुढ भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी अमित शहा यांची बिनविरोध फेरनिवड.

## आरोग्यमंत्र

### फळांचं सेवन वाढवा

शरीरातील सोडियम कमी करण्यासाठी काही औषधं दिली जात असली तरी सोडियमयुक्त पदार्थांचे सेवन कमी करुन सोडियमचे प्रमाण खूपच कमी असणारे घटक आहारात घेणं हा सर्वोत्तम पर्याय आहे. आज या गोष्टींबद्दल जाणून घेऊ या



* फळांमध्ये नैसर्गिकरित्या सोडियम कमी आणि पोटॅशियम जास्त असते. सफरचंदात सोडियमचे प्रमाण खूपच कमी असल्याचे आढळून आले आहे. सफरचंदमध्ये चरबीचे प्रमाण कमी असतेच खेरीज हे फळ व्हिटॅमिन सी आणि फायबरचा चांगला स्रोत आहे. सफरचंद आणि इतर फळांमध्ये आढळणारे पॉलिफेनॉल हृदयाच्या आरोग्यासाठीही फायदेशीर असते. म्हणून सफरचंदाच सेवन अवश्य करावं.

* काकडीत कॅलरीज, सोडियम आणि फॅट्स जवळजवळ नसतात. एक कप काकडीत ३ ग्रॅम सोडियम असते. ज्यामुळेच तुम्ही बिनधोक काकडी खाऊ शकता. काकडीत पाण्याची पातळी खूप जास्त असल्यामुळे ती शरीराला डिहायड्रेट होऊ देत नाही.

* बदाम हे हेल्दी स्नॅक आहे कारण १०० ग्रॅम बदामामध्ये एक मिलीग्राम सोडियम असते. बदामामध्ये अनेक पोषक आणि अँटिऑक्सिडंट्स आढळतात. व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिने, जस्त इत्यादींमुळे बदामाचे सेवन आरोग्यदायी ठरतं. बदाम रक्तातील साखरेची पातळी, रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. बदाम खाल्ल्याने भूक कमी होते, सहाजिकच वजन कमी होण्यासही खूप मदत होते.

## स्पोर्ट्स फॅक्ट्स

### फायरबॉल सॉकर आणि बेबी ऑलिंपिक

फायरबॉल सॉकर’ हा इंडोनेशियात खेळाला जाणारा खेळ आहे. या देशातली तरुण मुलं रमझानचं स्वागत या खेळाने करतात. इंडोनेशियातल्या पूर्व जावामध्ये मुलांच्या धाडसाची चाचणी घेण्यासाठी हा खेळ खेळवण्यात येतो. यासाठी वापरण्यात येणारा चेंडू नारळापासून तयार केलेला असतो. हा नारळ रॉकेलमध्ये बुडवून ठेवला जातो. खेळ सुरू होण्याआधी नारळाच्या चेंडूला आग लावली जाते. सर्व खेळाडूंच्या अंगाला मीठ आणि आगीपासून संरक्षण करणारे मसाले चोळले जातात. मग अनवाणी पायांनीच ते हा जळता चेंडू टोलवतात. याआधी काही धार्मिक विधीही केले जातात. यामुळे खेळाडूंना भाजत नाही, असं म्हटलं जातं.

बहारीनमध्ये दोन ते पाच वर्षांच्या छोट्या मुलांसाठीही ऑलिम्पिकचं आयोजन केलं जातं. २०१८ मध्ये बहरीन ऑलिम्पिक समितीने ही स्पर्धा आयोजित केली होती. लहानग्यांनी खेळाकडे वळावं हा यामागचा मुख्य उद्देश होता. अॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स, फुटबॉल आणि बास्केटबॉल असे खेळ यावेळी खेळवण्यात आले. यासोबत एक वर्षांखालच्या मुलांची रांगण्याची तर दीड वर्षांच्या मुलांची चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १२०० मुलं सहभागी झाली होती.

## स्टाईल स्टेटमेंट

### ट्रेंडी बनारसी अनारकली

लग्न किंवा पारंपरिक समारंभात त्याच त्या स्टाईलचे कपडे घालून कंटाळा आला असेल, लेहंगा घालण्याची इच्छा असूनही तो कॅरी करणं अवघड वाटत असेल तर तुम्ही बनारसी सूट शिवून घेऊ शकता. विविध डिझाइन्सचे हे सूट रॉयल लूक देतील. इतकंच नव्हे तर त्यावर फारशी ज्वेलरीही घालावी लागणार नाही. सौम्य मेक अप आणि साध्या हेअरस्टाईलने तुम्ही हा लूक खुलवू शकता. बनारसी सूट्सच्या काही ट्रेंडी पर्यायांवर नजर टाकू या.

* लेहंगा–चोली कॅरी करणं जिकिरीचं वाटत असेल तर सरळ लेहंगा स्टाईल बनारसी सूट शिवून घ्या. तुम्ही तो अनारकली स्टाईलने शिवून घेऊ शकता. तुमच्याकडे सुस्थितीतली बनारसी साडी असेल तर तिचाही सूट शिवून घेता येईल. नवी कोरी साडी विकत घेऊन आवडीप्रमाणे छानसा ड्रेस शिवून घेणंही शक्य आहे.

(क्रमश:)

## पंचांग

**शनिवार, २४ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. ६, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : उ. भाद्रपदा, योग : शिव,
सूर्योदय ७.१६, सूर्यास्त ६.२५

## फॉरवर्डस

**ये इनायतें ग़ज़ब क़ी ये बला क़ी मेहेरबानी...**

**हमारीं ख़ैरियत भीं पूछी क़िसी औऱ क़ी ज़बानी...!**

## फॅशन पॅशन

* लेअरिंग हा थंडीपासून बचाव करण्याचा लोकप्रिय फंडा असतो. यासाठी तुमच्याकडे फुल स्लीव्हजवाला टी शर्ट असायला हवा. असे टी शर्ट बजेटमध्ये बसतात. त्यामुळे फार विचार करण्याची गरज नसते. ते कशावरही घालता येतात.

* विंटर कॅप कान झाकण्यापुरती मर्यादित नाही तर ती तुम्हाला मॉडर्न आणि स्टायलिश लूकही देऊन जाते. ही कॅप कॅज्युअल आउटिंगला कॅरी करा. जीन्स, ट्राऊजर्स, चिनोज कशासोबतही ती घालता येते. छानशी विंटर कॅप तुमच्या वॉर्डरोबची शान ठरू शकते.

## जाणून घ्या

### केस गळतीने हैराण?

मित्रांनो, आजकाल ऐन तारूण्यात केस गळतीच्या समस्येत वाढ दिसून येत आहे. ही चिंतेची बाब ठरते. खरं तर केस गळणं ही समस्या वाटते तितकी साधी नाही. यामागे बरीच कारणं असू शकतात. परंतु काही घरगुती उपायांनी केस गळण्याचं प्रमाण कमी करता येईल.



* बीटमध्ये बरेच पोषक घटक असतात. बीटचा रस प्यायल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतात. बीट फक्त केसांसाठी नाही तर सर्वांगीण आरोग्यासाठी चांगला असतो. आठवड्यातून तीन वेळा बीटचा रस प्या.

* केसांचा नियमित मसाज करून घ्या. मसाजमुळे केसांची मुळं बळकट होतात. इतकंच नाही तर केस दाटही होतात.

* भृंगराजमुळे केसांना बळकटी मिळते. त्यामुळे भृंगराजयुक्त केश तेलाचा वापर करा. या तेलाने मसाज करा. यामुळे केसांची चांगली वाढ होईल.

* केसांचा दर्जा सुधारण्यासाठी दोन अंडी फेटून त्यात चमचाभर दही घाला. हे मिश्रण केसांना लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

* मुलं रोज केस धुतात. पण हा मोह टाळा. केस गळत असतील तर आठवड्यातून दोन वेळा केस धुवा. सौम्य शँपूचा वापर करा. तुमचा शँपू तसंच कंडिशनरमध्ये पॅराबेन आणि सल्फेट असे घटक असणार नाहीत याची खात्री करा.

## खेचाखेची

### रोड शो

सामान्य माणसाच्या आयुष्यातही एक रोड शो येतो...

आणि, तो म्हणजे...

मारुतीचे देऊळ ते मंगल कार्यालय !

## वेगळं काही

लंडनमधल्या ‘गेटविक’ विमानतळावर वाहनं पार्क करण्याची कामगिरी रोबोवर सोपवण्यात येणार आहे. यासाठी इथे येणाऱ्या लोकांना आपल्या गाड्या ‘ड्रॉप–ऑफ’ झोनमध्ये पार्क कराव्या लागतील. त्यानंतर रोबो त्या योग्य ठिकाणी पार्क करेल. ‘स्टेन’ नावाच्या या रोबोचं नियंत्रण मोबाईल अॅपद्वारे केलं जाईल. त्याची कार्यप्रणाली जीपीएस तंत्रज्ञानावर आधारित आहे. या रोबोमध्ये लिफ्टसारखं उपकरण बसवण्यात आलं असून त्याच्या सहाय्याने तो गाडी उचलतो आणि पार्किंगच्या भागात उभी करतो. ‘स्टेनली रोबोटिक्स’ या फ्रेंच कंपनीने स्टेनची निर्मिती केली आहे. हा रोबो गाड्या एकमेकांजवळ उभ्या करेल. त्यामुळे बरीच जागा वाचू शकेल, असं कंपनीचं मत आहे.

## स्टाईल स्टेटमेंट

### लक्षवेधी दुपट्टे

विवाहासारख्या आयुष्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी नवरीला छान दिसायचं असतं. वेगळेपण जपायचं असतं. स्वागत सोहळ्यात बऱ्याच मुली लेहंगा चोली परिधान करतात. या पेहरावाची शोभा वाढवतो दुपट्टा. युनिक आणि ट्रेंडी दुपट्टा लक्षवेधी ठरतो. बाजारात विविध रंगांचे, प्रकारचे, डिझाइन्सचे दुपट्टे मिळतात. त्याविषयी...



* बॉर्डरवर मिरर वर्क केलेले दुपट्टे सुंदर दिसतात. विशेष म्हणजे ही फॅशन कधीच जुनी होत नाही. त्यामुळे असे दुपट्टे वेगवेगळ्या पारंपरिक पेहरावावरही घेता येतात. * घुंगरू लावलेले दुपट्टेही उठून दिसतात. सध्या अशा दुपट्टयांचा ट्रेंड नसला तरी लग्नातल्या एखाद्या सोहळ्यासाठी हा दुपट्टा घेता येईल.

* साधेपणा जपणाऱ्या तरुणी टस्सल वर्कवाला दुपट्टा घेऊ शकतात. मेहंदी, संगीत अशा सोहळ्यांसाठी हा दुपट्टा बेस्ट आहे. * दुपट्टे असो किंवा ब्लाउज, छानशी लटकन त्यांची शोभा वाढवते. लग्नातल्या सोहळ्यांसाठी नाजूक गोटा लटकनवाले दुपट्टे घ्या. * गोटा पत्तीचं डिझाइनही हिट आहे. * ‘स्कॅलप्ड बॉर्डर’ दुपट्टयांची चलती आहे. दुपट्टयाच्या बॉर्डरला वेगळ्या डिझाइनची झालर किंवा लेस लावली जाते. याला ‘स्कॅलप्ड बॉर्डर’ म्हणतात.

## सुडोकू ५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५ | ३ | | ६ | | | | ७ |
| १ | | ४ | ३ | | ७ | | | ५ |
| | | | | १ | | | | ४ |
| | ८ | १ | ४ | ७ | | | | ३ |
| | | | ८ | | ३ | | | |
| ३ | | | | ५ | १ | ८ | ४ | |
| ९ | | | | ३ | | | | |
| ६ | | | १ | | ५ | ९ | | ८ |
| ५ | | | | ८ | | ४ | ३ | |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ४ | ६ | ५ | ९ | २ | ३ | ८ | १ |
| ५ | ८ | ३ | ४ | १ | ७ | २ | ६ | ९ |
| २ | ९ | १ | ३ | ८ | ६ | ४ | ७ | ५ |
| ३ | ५ | ७ | १ | २ | ४ | ८ | ९ | ६ |
| ६ | २ | ४ | ९ | ५ | ८ | १ | ३ | ७ |
| ८ | १ | ९ | ७ | ३ | ६ | ५ | २ | ४ |
| ९ | ७ | ८ | २ | ४ | १ | ६ | ५ | ३ |
| १ | ३ | २ | ६ | ७ | ५ | ९ | ४ | ८ |
| ४ | ६ | ५ | ८ | ३ | ९ | ७ | १ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ५७



**आडवे शब्द :-**

१) निवडणुकीला उभा राहिलेला
५) संध्याकाळ
१०) उत्तम घोडा
११) दुनिया
१३) भव्य, अवाढव्य
१४) सातू, एक बारीक धान्य
१५) गोमाता
१६) दारू पिणे
१९) बुद्धाच्या अवशेषावर बांधलेली विशेष आकाराची इमारत
२२) तादाम्य, निमग्न
२४) कबूतर
२६) पराग, मातीचा कण
२८) पळून गेलेला
३०) सांभाळणारा, एक पालेभाजी
३२) पती, यजमान
३४) कामातील टाळाटाळ
३५) संगीतातील एक राग
३६) ओठांच्या चुंबनाचे सुख
३७) ठसा
३८) मान्यतेचा शब्द
३९) गिळंकृत करणे
४२) निवासस्थान
४३) वर्षाच्या बोलीने नेमलेला मजूर
४४) मळलेला, मलीन
४६) अर्णव
४८) आरोळी
४९) मांडणी, सजावट
५१) आरोप
५३) पृष्ठभागावरील छोटासा तुकडा
५५) दुर्दशा
५७) कापडाची रुंदी
५८) चंद्र
५९) कान, दुर्योधनाचा मित्र
६०) जाजम, आयताकृती कापडी बैठक.

**उभे शब्द :-**

१) पहाट
२) रावण
३) डावा
४) दागदागिने
६) हवामानाचा अभ्यास करणारी संस्था
७) बारा महिन्याचा काळ
८) सामान
९) गती
१७) सरस्वतीचे एक नाव
१८) किंमत, मूल्य
२०) पंख
२१) चांदणी
२३) लेखणी
२५) भांडण, चर्चा
२७) जन्म मरण
२८) खग, पाखरू
२९) शंकराचे एक नाव
३०) हालचालीवर ठेवलेली नजर
३१) बडबड, त्रास
३३) योग्य, उचित
३४) तयार चहा–कॉफी मिळण्याचे हॉटेल
३७) ठाण्याचा रहिवासी
३९) थकून जाणे
४०) इच्छा
४१) माराची उमटलेली खूण
४२अ) उपकार
४५) कडक, निबर, घट्ट
४६) पापुद्रा
४७) रमापती
५०) होडी
५२) बाल कृष्ण, लहान मूल
५४) चिंता, घोर
५६) तृतीया
५७) पान

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

## सर्वश्रेष्ठ गीतकार व संवाद लेखक जावेद अख्तर

**हिंदी चित्रपटसृष्टीतील उर्दू शायरीचा वारसा चालविणारे प्रख्यात गीतकार, पटकथालेखक जावेद अख्तर म्हणजे चित्रपट सृष्टीतले आठवे आश्चर्यच जणू.**



श्रीराम शेटये

सर्जनशील आणि विद्वान व्यक्तींच्या कुटुंबात सर्जनशीलतेचा वारसा लाभलेले प्रख्यात कवी, कथालेखक आणि गीतकार म्हणून जावेद अख्तर यांची ओळख चित्रपट सृष्टीत आहेच. मात्र संवेदनशीलतेचा, तरलतेचा, सर्जनशीलतेचा हा नियम निसर्गाने अख्तर कुटुंबियांसाठी तंतोतंत पाळला आहे, असेच म्हणावे लागेल. वडील जाँ निसार अख्तर १९५०-६० च्या दशकातील प्रख्यात उर्दू कवी आणि गीतकार, आई सफिया अख्तर गायिका, शिक्षिका आणि लेखिका. आजोबा कवी, तत्त्वज्ञानी आणि उर्दूचे गाढे अभ्यासक होते. त्यांचे पणजोबा फझल-ए-हक खैराबादी हे इस्लामिक अभ्यास आणि धर्मशास्त्राचे विद्वान होते आणि १८५७ मध्ये भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बंडखोरीतील त्यांच्या भूमिकेसाठी, फजल-ए-हक खैराबादीला अंदमान आणि निकोबार बेटांवरील काला पानी तुरुंगात पाठवण्यात आले, जिथे १९ ऑगस्ट १८६१ रोजी त्यांचा मृत्यू झाला. अशा सर्जनशील कुटुंबात जावेद अख्तर यांचा जन्म १७ जानेवारी १९४५ रोजी ग्वाल्हेर येथे झाला.

आई साफिया अख्तर स्वतः लेखिका होती. त्या क्रांतिकारी कवी, तसेच स्वातंत्र्यसैनिक आणि संसद सदस्य अंसार हरवाणी यांच्या बहिण होत्या. त्यांची बहीण लेखिका, अर्थतज्ज्ञ आणि शिक्षिका हमीदा सलीम तर जावेद यांचा सलमान अख्तर हा भाऊ एक प्रसिद्ध मनोविश्लेषक आणि लेखक आहे, जो फिलाडेल्फिया येथील जेफरसन मेडिकल कॉलेजमध्ये मानसोपचार आणि मानवी वर्तनाचा अभ्यासक, प्राध्यापक म्हणून काम करतात. जावेद यांना शाहिद अख्तर हा सावत्र भाऊ आणि उनेझा अख्तर आणि अलबिना नावाच्या दोन सावत्र बहिणी देखील आहेत.जावेद यांना बालपणी 'जादू' या नावाने बोलावले जायचे. त्यांच्या वडिलांच्या 'लम्हे, लम्हे किसी जादू का फसाना होगा'या कवितेवरून घेतले गेले होते. 'जादू' या शब्दाच्या सर्वात जवळ असल्यामुळे त्याला 'जावेद' हे अधिकृत नाव देण्यात आले. जावेद यांचे बहुतेक बालपण लखनौमध्ये गेले, त्यांनी अलिगढच्या मिंटो सर्कल स्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केले, त्यानंतर कोल्विन तालुकादार महाविद्यालयात शिक्षण घेत त्यांनी भोपाळच्या सैफिया महाविद्यालयातून (कला शाखेतील पदवी) प्राप्त केली. त्यांच्या महाविद्यालयीन काळात ते एक चांगले वादविवाद स्पर्धक होते आणि त्यांनी सलग तीन वर्षे रोटरी क्लब पुरस्कार जिंकला. त्यांनी अनेक आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धाही जिंकल्यात, दिल्लीतील राष्ट्रीय युवा महोत्सवात विक्रम विद्यापीठाचे प्रतिनिधित्वही केले.

बॉलिवूडमध्ये मोठे स्थान मिळवण्याच्या आशेने जावेद १९६४ मध्ये मुंबईत आले. खिशात पैसे नव्हते. झोपायला जागाही नव्हती. झाडांखाली किंवा बागेतील बाकांवर रात्र घालवल्यानंतर, अखेरीस प्रयत्नांनी जोगेश्वरी येथील कमाल अमरोही स्टुडिओमध्ये राहण्यासाठी जागा मिळाली. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात, जावेद यांना संघर्षशील लेखक आणि अभिनेता सलीम खान हा सहकाऱ्याच्या रुपात भेटला. दोघांनी एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला. सलीम खान आणि जावेद पहिल्यांदा 'सरहदी लुटेरा' या चित्रपटाच्या सेटवर भेटले, या चित्रपटात सलीम अभिनेता होते आणि जावेद क्लॅपर बॉय होते. नंतर जावेद यांना संवादलेखक म्हणून पदोन्नती मिळाली.

संवादलेखनात सलीम-जावेद या द्वयीने भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी पटकथा लेखकांच्या जोडीची सुरुवात झाली. कथा आणि पात्रे विकसित करण्याची जबाबदारी सलीम खान यांच्यावर होती, तर संवाद लिहिण्यावर जावेद अख्तर यांनी लक्ष केंद्रित केले. मात्र काम मिळत नसल्याने त्यांनी उदरनिर्वाहासाठी सुरुवातीला चित्रपटांसाठी घोस्ट रायटर म्हणून त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात केली.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'अंदाज' (१९७१) चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान राजेश खन्ना यांना त्यांच्या प्रस्तावित चित्रपटांपैकी एका चित्रपटाची कथा आवडत नव्हती. याचवेळी सलीम जावेद त्यांना भेटले आणि राजेश खन्ना यांनी या चित्रपटाची कथा दुरुस्त करण्यास दिली. सलीम जावेद यांनी संपूर्ण कथा बदलली आणि चित्रपट 'हाथी मेरे साथी' (१९७१) चा जन्म झाला. ही सलीम-जावेद युगाची सुरुवात होती, कारण पुढे जाऊन हे दोन्ही चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले, या यशाने या लेखक द्वयीला ओळख मिळाली. त्यांनी १९७० आणि १९८० च्या दशकात भारतीय चित्रपटसृष्टीत क्रांती घडवून आणली, हिंदी चित्रपटांच्या कथेत आमुलाग्र बदल घडवून आणला आणि अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांचे लेखन केले. 'अंदाज आणि 'हाथी मेरे साथी' या चित्रपटांना मिळालेल्या यशानंतर लगेचच, रमेश सिप्पी दिग्दर्शित आणि हेमा मालिनी अभिनीत 'सीता और गीता'(१९७२) हा त्यांचा आणखी एक ब्लॉकबस्टर चित्रपट आला. त्यानंतर प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३) हा चित्रपट होता; या चित्रपटाने अमिताभ बच्चन यांच्या 'अँग्री यंग मॅन' कारकिर्दीची सुरुवात झाली. 'जंजीर' या चित्रपटाने हिंदी चित्रपटांमध्ये पोलिसांच्या कथा सादर करण्याची पद्धत बदलली. या चित्रपटाच्या यशाने अमिताभ बच्चन यांना स्टारडम मिळवून दिले आणि सलीम-जावेद यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पटकथा लेखक म्हणून स्थापित केले.

१९७५ मध्ये त्यांनी यश चोप्राचा 'दिवार' (१९७५) लिहिला जो आतापर्यंतच्या सर्वात महान भारतीय चित्रपटांपैकी एक मानला जातो. विरुद्ध बाजूच्या दोन भावांच्या कथांचा प्रवाह चित्रपटसृष्टी सुरू झाला. या चित्रपटाने अंडरवर्ल्डशी संबंधित कथांचा ट्रेंडही सुरू केला. त्याच वर्षी त्यांनी 'शोले' (१९७५) हा चित्रपट लिहिला, हा चित्रपट आतापर्यंतच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या भारतीय चित्रपटांपैकी एक आहे आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील अभिजात चित्रपट मानला जातो. या चित्रपटातील संस्मरणीय पात्रे, संवाद आणि ॲक्शन दृश्यांनी या चित्रपटाला अविस्मरणीय केले आहे.त्यांच्या काही उल्लेखनीय कामांमध्ये लॉस्ट ॲण्ड फाऊंड फॉर्म्युला असलेला 'यादों की बारात' (१९७३) हा चित्रपट, सस्पेन्स थ्रिलर 'मजबूर' (१९७४), अमिताभ बच्चन, शशी कपूर आणि संजीव कुमार यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'त्रिशूल' (१९७८), चंद्र बारोट दिग्दर्शित आणि अमिताभ बच्चन यांची दुहेरी भूमिका असलेला 'डॉन' (१९७८), भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक मानला जाणारा 'काला पत्थर' (१९७९), ॲक्शन थ्रिलर 'शान' (१९८१) आणि ऐतिहासिक 'क्रांती' (१९८१) या चित्रपटांचा समावेश आहे.

'हाथ की सफाई' (१९७४), 'आखरी दांव' (१९७५), 'प्रेमदा कनिके' (१९७६), 'राजा नन्ना राजा' (१९७६), 'इमान धरम' (१९७७), 'चाचा भतीजा' (१९७७), 'दोस्ताना' (१९८०) आणि 'शक्ती' (१९८२) हे त्यांचे अजून गाजलेले चित्रपट. प्रेमदा कनिके आणि राजा नन्ना राजा या दोन कन्नड चित्रपटांसह त्यांनी २४ चित्रपटांसाठी एकत्र काम केले. सलीम-जावेद या जोडीमध्ये १९८२ मध्ये फूट पडली असली तरी त्यांनी यापूर्वी लिहिलेल्या 'जमाना' (१९८५) आणि 'मिस्टर इंडिया' (१९८७) या पटकथाही यशस्वी ठरल्या. १९८३ मध्ये जावेद अख्तर यांनी 'बेताब' (१९८३) या चित्रपटातून एकल पटकथा लेखक म्हणून पदार्पण केले. यासोबत जावेद अख्तर यांनी चित्रपटांसाठी गीते आणि पटकथा लिहिणे सुरु केले. तर सलीम खान यांनीही स्वतंत्ररित्या पटकथा लिहिण्यासोबत तरुण लेखक आणि चित्रपट निर्मात्यांना मार्गदर्शन करणे सुरू ठेवले.

जावेद अख्तर यांनी आपल्या गीतलेखनाच्या कारकिर्दीची सुरुवात 'सिलसिला' (१९८१) या चित्रपटातील 'देखा एक ख्वाब' या गाण्यापासून केली, त्यानंतर 'साथ-साथ' (१९८२), 'मशाल' (१९८४), 'सागर' (१९८५), 'मिस्टर इंडिया' (१९८७), 'तेजाब' (१९८८), 'सैलाब' (१९९०), 'गर्दिश' (१९९३), '१९४२: अ लव्ह स्टोरी' (१९९४), 'पापा कहते हैं' (१९९६), 'सरदारी बेगम' (१९९६), 'बॉर्डर' (१९९७), 'विरासत' (१९९७), 'येस बॉस' (१९९७), '१९४७ अर्थ' (१९९९), 'बादशाह' (१९९९), 'फिर भी दिल है हिंदुस्तानी' (२०००), 'रिफ्यूजी' (२०००), 'दिल चाहता है' (२००१), 'झुबेदा' (२००१), 'लगान' (२००१), 'चलते चलते' (२००३), 'कल हो ना हो' (२००३), 'मैं हूं ना' (२००४), 'जोधा अकबर (२००८), वेक अप सिड (२००९), माय नेम इज खान (२०१०) दिल धडकने दो (२०१५), गली बॉय (२०१९) खो गये हम कहाँ (२०२३) या चित्रपटातून त्यांची कारकिर्द बहरत राहिली.

'साज' (१९९६), 'बॉर्डर' (१९९७), 'गॉडमदर' (१९९८), 'लगान' (२००१) आणि 'रिफ्यूजी' (२०००) या चित्रपटांसाठी पाच वेळा सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जिंकून जावेद अख्तर हे आतापर्यंतचे सर्वात यशस्वी गीतकारांपैकी आहेत. तसेच १९४२ लव्ह स्टोरी मधील 'एक लडकी को देखा' साठी, 'पापा कहते है' मधील 'घर से निकलते ही', 'बॉर्डर' मधील 'संदेश आते है', 'रिफ्यूजी' मधील 'पंछी नादिया पवन के झोंके', 'लगान' मधील 'राधा कैसे ना जले', 'कल हो ना हो' मधील 'कल हो ना हो', 'वीर-जारा' मधील 'तेरे लिए' आणि 'जोधा अकबर' मधील 'जश्न-ए-बहार' या गाण्यांसाठी त्यांना आठ वेळा सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे. यासोबतच 'मैं आजाद हूं' (१९८९) या चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट संवाद लेखनाचा पुरस्कारही मिळाला आणि 'बेताब' (१९८२), 'मशाल' (१९८४) आणि 'अर्जुन' (१९८५) या चित्रपटांसाठी त्यांना फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट कथा पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. एक संवाद लेखक, एक गीतकार म्हणून जावेद अख्तर हे सर्वोच्च स्थानावर विराजमान झाले आहेत. ●●

## 'बॉर्डर २'ची छप्परतोड कमाई

येत्या २३ जानेवारीला प्रदर्शित होणाऱ्या सनी देओलच्या बॉर्डर २ या चित्रपटाने प्रदर्शनापूर्वीच तिकीट खिडकीवर अक्षरशः वादळ निर्माण केले आहे. २० जानेवारी २०२६ पर्यंतच्या अधिकृत आकडेवारीनुसार, या चित्रपटाच्या आगाऊ बुकिंगने ऐतिहासिक टप्पा ओलांडला असून पहिल्या दिवसासाठी आतापर्यंत ३५ कोटींहून अधिक रुपयांची तिकिटे विकली गेली आहेत. देशभरातील पीव्हीआर, आयनॉक्स आणि सिनेपोलिस यांसारख्या प्रमुख मल्टिप्लेक्स साखळींमध्ये या चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या जवळपास ४.५ लाखांहून अधिक तिकिटांची आगाऊ विक्री झाली आहे. व्यापार विश्लेषकांच्या मते, प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली देशभक्तीची लाट आणि मूळ बॉर्डर चित्रपटाची प्रचंड लोकप्रियता यामुळे या चित्रपटाचे ओपनिंग कलेक्शन ५५ ते ६० कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे, जे २०२६ मधील आतापर्यंतचे सर्वाधिक ओपनिंग कलेक्शन ठरू शकते. बॉक्स ऑफिसवर सध्या सुरू असलेल्या इतर चित्रपटांचा विचार करता, प्रभासचा द राजा साब हा चित्रपट प्रदर्शनाच्या ११ व्या दिवशीही तग धरून आहे. २० जानेवारीपर्यंत या चित्रपटाने भारतात सुमारे १४०.५० कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले असून जागतिक स्तरावर या चित्रपटाने २०० कोटींचा आकडा पार केला आहे. जरी या चित्रपटाच्या कमाईत दुसऱ्या आठवड्यात ३० ते ४० टक्क्यांची घट पाहायला मिळत असली, तरी प्रभासच्या चाहत्यांमुळे तेलगू आणि तमिळ भाषिक राज्यांमध्ये चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र, येत्या शुक्रवारी बॉर्डर २ प्रदर्शित होत असल्याने द राजा साबच्या स्क्रीनच्या संख्येत मोठी कपात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दुसरीकडे, रणवीर सिंग अभिनित धुरंधर या चित्रपटाने प्रदर्शनाच्या ४६ व्या दिवशी ८२५ कोटींचा टप्पा ओलांडून हिंदी चित्रपटसृष्टीत नवा इतिहास रचला आहे. या चित्रपटाने पुष्पा २ सारख्या मोठ्या चित्रपटांचे रेकॉर्ड मोडीत काढले असून तो सध्या भारतातील सर्वात यशस्वी चित्रपटांपैकी एक ठरला आहे. तसेच, मराठी सिनेसृष्टीत क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट १८.७७ कोटींच्या कमाईसह सुपरहिट ठरला असून कमी बजेटमध्ये सर्वाधिक नफा मिळवणारा चित्रपट म्हणून त्याने आपले स्थान पक्के केले आहे.




## कुठंय तो नागराज मंजुळे?



मराठी सिनेसृष्टीत २०१६ साली सैराट चित्रपटाने इतिहास रचला आणि रिंकू राजगुरू रातोरात घराघरात पोहोचली. आज हा चित्रपट प्रदर्शित होऊन दहा वर्षे उलटली असली, तरी आर्ची हे पात्र आजही तितकेच लोकप्रिय आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत रिंकूने नागराज मंजुळे यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीचा आणि 'सैराट'साठी तिची निवड कशी झाली, याचा एक मजेशीर किस्सा सांगितला आहे. सौमित्र पोटे यांच्या 'मित्र म्हणे' या पॉडकास्टमध्ये रिंकूने ही आठवण शेअर केली. रिंकू म्हणाली की, जेव्हा तिला समजले की तिच्या गावात एक राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक आले आहेत, तेव्हा ती त्यांना फक्त पाहण्यासाठी गेली होती. तिला अभिनयाचा किंवा ऑडिशनचा कोणताही अनुभव नव्हता. ती फक्त १३ वर्षांची होती आणि शाळा बुडवून कोणातरी प्रसिद्ध व्यक्तीला बघायला जायचे, एवढाच तिचा उद्देश होता. तिथे पोहोचल्यावर एका कॅफेमध्ये ती एका खुर्चीवर बसली आणि समोरच असलेल्या एका माणसाला तिने निरागसपणे विचारले, 'कुठंय तो नागराज मंजुळे?' समोरच्या व्यक्तीने शांतपणे उत्तर दिले, **''मीच आहे, बोल.''** हे ऐकून रिंकूची मोठी फजिती झाली. त्यानंतर नागराज यांनी तिला विचारले, ''ऑडिशन देशील का?'' रिंकूने प्रांजळपणे कबूल केले की तिला ऑडिशन वगैरे काही येत नाही. काय येते असे विचारल्यावर तिने ''डान्स येतो'' असे सांगितले. नुकत्याच शाळेत झालेल्या स्नेहसंमेलनातील देवा श्रीगणेशा या गाण्यावर तिने डान्स करून दाखवला आणि त्याच सहजतेने नागराज यांनी तिची निवड केली. रिंकूच्या मते, काम नशिबात असेल तर ते आपोआप तुमच्याकडे येते. तिला त्यावेळी कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य नव्हते, पण त्याच एका भेटीने तिचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकले. सध्या रिंकू राजगुरू अशोक सराफ आणि मकरंद अनासपुरे यांच्यासोबत पुन्हा एकदा साडे माडे तीन या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असून, प्रेक्षक तिच्या या आगामी प्रोजेक्टची वाट पाहत आहेत.

## 'बिग बॉस'च्या घरात प्रेमाचे वारे!

बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाने अवघ्या नऊ दिवसांत प्रेक्षकांची चांगलीच पकड घेतली आहे. घरातील वादविवादांच्या पार्श्वभूमीवर आता प्रेक्षकांना एक रोमँटिक ट्विस्ट पाहायला मिळत आहे. प्रसिद्ध अभिनेता आयुष संजीव आणि तन्वी कोळते यांच्यात वाढत असलेल्या जवळीकीमुळे घरात नव्या प्रेमप्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. मागील काही भागांपासून आयुष आणि तन्वी एकमेकांसोबत बराच वेळ घालवताना दिसत आहेत. ९ व्या भागामध्ये या दोघांमधील केमिस्ट्री अधिकच स्पष्टपणे दिसून आली. त्यांच्यातील संवाद आणि एकमेकांना दिलेली साथ पाहून घरातील इतर सदस्यांनीही त्यांच्या नात्यावर कमेंट्स करायला सुरुवात केली आहे. प्रेक्षकांसाठी हा एक नवा आणि मनोरंजक बदल ठरत असून, हा लव्ह अँगल खेळाचा भाग आहे की खरोखर दोघांमध्ये सूत जुळतंय, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.



## प्राजक्ता शुक्रेमुळे 'पॉवर की' गमावली!

'बिग बॉस मराठी ६'च्या घरात सत्तेचे समीकरण बदलण्यासाठी दिलेला एक टास्क सदस्यांच्या वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या टास्कमध्ये करण सोनवणे याला महत्त्वाची पॉवर की मिळण्याची शक्यता होती, ज्यामुळे त्याला घरात विशेष अधिकार प्राप्त झाले असते. मात्र, प्राजक्ता शुक्रे हिने घेतलेल्या निर्णयामुळे करणच्या हाता तोंडाशी आलेली ही संधी हुकली आहे. टास्कदरम्यान प्राजक्ता आणि करण यांच्यात तीव्र मतभेद पाहायला मिळाले. प्राजक्ताने दाखवलेल्या भूमिकेमुळे पॉवर की रद्द करण्यात आली, ज्यामुळे करणचा मोठा डाव उलटला. या घटनेनंतर करण प्रचंड संतापलेला पाहायला मिळाला आणि त्याचे प्राजक्तासोबत जोरदार खटके उडाले. पॉवर की हातची गेल्यामुळे घरातील सत्तेचा समतोल आता कोणाकडे झुकणार आणि या वादाचा परिणाम पुढील आठवड्याच्या नामांकनावर कसा होणार, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.



# बालांगण

## घेऊ नका ताण

हेल्थ वेल्थ

**खे**ळामुळे तुम्ही तंदुरूस्त राहता. तुम्ही क्रीडा स्पर्धांमध्येही सहभागी होत असाल. एखाद्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुम्ही खूप तयारी करता, सराव करता. पण स्पर्धेचा खूप ताणही असतो. थोडा ताण येणं अगदी स्वाभाविक आहे. पण स्पर्धेचा खूप ताण घेणं चुकीचं आहे. स्पर्धेचा ताण येऊ नये यासाठी काय करायला हवं याविषयी... खेळांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा असतात. टेनिस, बॅडमिंटनसारख्या खेळांमध्ये तुम्ही एकटे असता तर क्रिकेट, हॉकीमध्ये संघातले एक सदस्य असता. स्पर्धेत सहभागी होण्याआधी तुमच्या पोटात फुलपाखरं उडतात का? तुम्हाला कसं तरी वाटतं का? स्पर्धेच्या आधी अनेकांना असं होऊ शकतं. आपल्याकडून कोणतीही चूक होऊ नये, ही यामागची भावना असते. अर्थात बड्या खेळाडूंनाही क्रीडा स्पर्धांचा ताण येतो. थोडा ताण येणं ठिक आहे. यामुळे तुमचं शरीर आणि मन स्पर्धेसाठी तयार होतं. आपल्या शरीरात विशिष्ट प्रकारचे हार्मोन तयार होतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. पण खूप ताण आला असेल तर यामागची कारणं शोधणं गरजेचं आहे. स्पर्धे आधी भरपूर झोप घ्या. ताणामुळे झोप येत नाही. पण याचा त्रास पुढे होतो. यामुळे स्पर्धेत लक्ष केंद्रित करणं कठिण होऊन बसतं. स्पर्धेच्या दिवशी पोषक आहार घ्या. स्पर्धेआधीच्या सगळ्या सराव सत्रांना हजर राहा. संघातल्या सहकाऱ्यांशी बोला. प्रशिक्षकांची मदत घ्या. स्पर्धेआधी थोडा आराम करा. गाणी ऐका. आवडते चित्रपट बघा. यामुळे ताण कमी होईल. छानसं पुस्तकही वाचता येईल. खेळ म्हटला की जय आणि पराजय ठरलेले असतात. अपयशातून धडे घ्या. आधीच्या चुका पुन्हा करू नका. पुढच्या वेळी अधिक जोमाने सराव करा पण स्पर्धेचा ताण अजिबात घेऊ नका.



## इथे नाहीत रस्ते!



फन टाईम

**तु**मच्या शहरात रस्ते नसतील तर? मग प्रवास कसा करायचा, हा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. पण जगातल्या बऱ्याच शहरांमध्ये रस्ते नाहीत बरं का! इटलीमधील व्हेनिस शहरात रस्ते नाहीत. इथले लोक बोटीने प्रवास करतात. नेदरलँडमध्येही असं एक शहर आहे. या शहरात चीनमधले पर्यटक मोठ्या संख्येने येतात.

गीथोर्न हे नेदरलँडमधलं सर्वात सुंदर शहर मानलं जातं. याला फेअरी टेल व्हिलेज असंही म्हणतात. लिटल व्हेनिस या नावानेही हे शहर ओळखलं जातं. या शहरात दर वर्षी दीड ते दोन लाख चिनी पर्यटक येतात. डच चित्रपटनिर्माते बर्ट हन्सतरा यांनी आपल्या चित्रपटात या शहराचं दर्शन घडवलं होतं. या शहरातले पोलीसही बोटीतूनच प्रवास करतात. या शहराची लोकसंख्या आहे अवघी २६००. इथल्या लोकांकडे प्रवासासाठी गाडी, बाईक असं काहीही नाही. हे संपूर्ण शहर एका तलावाच्या किनारी वसलं आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी इथे पूल बांधण्यात आले आहेत. या शहरात लाकडी पुलांची संख्या १८० आहे. इथे बोटीतूनच प्रवास करावा लागतो. दुसरा कोणताही मार्ग इथल्या रहिवाशांकडे नाही. दररोजच्या खरेदीसाठीही बोटीतूनच जावं लागतं. इथले पोस्टमनही बोटीतूनच प्रवास करतात. या शहरात फिरायचं असेल तर तुमच्याकडे ७५ युरो असले पाहिजेत. एवढे पैसे दिले की तुम्ही ७.३० तास अगदी निवांत फिरू शकता. अशा ठिकाणी जायला आणि बोटीतून फिरायला काय मजा येईल नाही?

## वायफायशिवाय करा डाटा ट्रान्सफर



स्मार्ट टेक

**प**र्यावरणाला धोका न पोहोचवता आता डाटा ट्रान्सफर करणं शक्य होणार आहे. डाटा ट्रान्सफर करण्यासाठी वायफाय तंत्रज्ञानाची मदतही घ्यावी लागणार नाही. एलईडी लाईट्सच्या मदतीने डाटा ट्रान्सफर करणं लवकरच शक्य होणार आहे. ब्रिटनमधल्या एडनबर्ग विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. एलईडी दिवे प्रकाश देण्यासोबतच डाटा ट्रान्सफर करू शकतील, अशा प्रकारचं हे तंत्रज्ञान आहे. या पद्धतीत प्रकाशात कोणताही बदल होणार नाही तसंच विजेचा वापरही मर्यादित प्रमाणात असेल.

याआधी डाटा ट्रान्सफर करण्यासाठी लायफाय तंत्रज्ञानाचा वापर केला जात असे. यात ऊर्जेचा अधिक वापर होण्यासोबतच प्रकाशाचे रंग आणि तीव्रतेवरही परिणाम होत असे पण नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने ही कमतरता दूर करता येणं शक्य होणार आहे. या संशोधनामुळे वायरलेस ट्रान्सफर सिस्टिम विकसित करणं शक्य होणार आहे. एलईडी तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल, टॅबलेट किंवा इतर यंत्रांमधला डाटा ट्रान्सफर करता येतो, याची माहिती शास्त्रज्ञांना होती. पण या प्रक्रियेत एलईडीच्या वैशिष्ट्यांवर दुष्परिणाम होऊ नये, यासाठी प्रयत्न सुरू होते. डाटा ट्रान्सफर करण्यासाठी एलईडी मोर्स कोडप्रमाणे काम करेल. मोर्स कोड ही रेडियो लहरींची एक भाषा आहे. या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अनेक लाभ होणार आहेत. यामुळे एलईडी दिव्यांचा वापर वायफायसारखा करणं शक्य होणार आहे.

## करीअर फिल्म मेकिंगमधलं...



कोण होणार?

**तु**म्हाला चित्रपट बघायला आवडतो. चांगली कथानकं असलेले चित्रपट भरपूर कमाई करतात. चित्रपट हा समाजाचा आरसा असतो असं म्हणतात. चित्रपटाच्या माध्यमातून तुम्ही आपल्या कल्पनांना मूर्त रूप देऊ शकता. आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणू शकता. तुम्हालाही चित्रपट हे माध्यम आवडत असेल तर फिल्म मेकिंगमध्ये करीअर करता येईल. चित्रपटाची निर्मिती करण्यासाठी तुमच्याकडे कॅमेरा हवा, चांगलं कथानक हवं, कलाकार हवेत. चित्रपटाची विशिष्ट भाषा हवी. चित्रपटात दृश्य असतात, आवाज असतो, गाणी–संगीत असतं. चित्रपटनिर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. चित्रपटांचा हा प्रवास खूप अनोखा आहे. आजच्या काळात थ्रीडी, डिजिटल माध्यमांद्वारे चित्रपटनिर्मिती केली जाते. या क्षेत्रात बारावीनंतर करीअर करता येईल. फिल्म मेकिंगच्या क्षेत्रात पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही पदवी अभ्यासक्रमही आहेत. बारावीनंतर तुम्ही पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकता तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी किमान ४० टक्के गुणांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणं गरजेचं असतं. पटकथा, दिग्दर्शन, सिनेमाटोग्राफी, संगीत, कोरियोग्राफी, व्हिडिओ एडिटिंग, बॅकग्राउंड साउंड, वितरण आणि प्रमोशन, चित्रपट समिक्षा अशा विविध विभागांमधले तज्ज्ञ म्हणून तुम्ही काम करू शकता. पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन सिनेमा, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डायरेक्शन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सिनेमाटोग्राफी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन साउंड रेकॉर्डिंग अँड साउंड डिझाइन असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## फीचर्स गुगल क्रोमचे...

स्मार्ट फन

**स्मा**र्टफोन असो किंवा कॉम्प्युटर, सर्फींग करण्यासाठी तुम्ही कोणत्या ना कोणत्या ब्राउजरचा वापर करतच असाल. बरेच लोक गुगल क्रोमच्या माध्यमातून सर्फिंग करतात. क्रोम हे जगातलं सर्वात लोकप्रिय असं सर्च इंजिन आहे. गुगल क्रोममध्ये अनेक फीचर्स आहेत. या फीचर्सचा वापर करून तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे नेट सर्फिंग करू शकता. गुगलच्या या तीन फीचर्सविषयी जाणून घ्या.




✻ अनेकदा आपण इतरांच्या कॉम्प्युटर किंवा स्मार्टफोनवर नेट सर्फिंग करतो. तसंच गुगल आपली माहिती जाणून घेत असतं. यावरून आपल्या कॉम्प्युटर स्क्रीनवर जाहिरातींचा मारा होत असतो. आपण काय सर्च केलं आहे हे कोणाला कळू नये असं वाटत असेल तर इनकॉग्निटो मोडची निवड करता येईल. यामुळे तुमची सर्च हिस्ट्री गुप्त राहते. ब्राउजरच्या मेनूमध्ये तुम्हाला हे फीचर मिळेल.

✻ इनकॉग्निटो मोडबद्दल अनेकांना माहीत असतं पण डायरेक्ट सर्च या ऑप्शनची माहिती फार कमीजणांना असते. गुगलवर दुसरं पेज ओपन केलं असेल तरी तुम्ही एखादा शब्द सर्च करू शकता. यासाठी तुम्हाला दुसरा टॅब ओपन करायची गरज भासणार नाही. शोधायच्या असलेल्या शब्दावर तुम्ही होल्ड करा. यामुळे गुगल लोगोसह तो शब्द दिसू लागेल. गुगल लोगोवर टॅप केल्यावर त्याच पेजवर राहून तुम्ही सर्च करू शकाल.

✻ गुगल क्रोमवर सर्च करताना तुम्ही डाटा सेव्ह करू शकता. स्मार्टफोनवर गुगल क्रोमचा वापर करणाऱ्यांना हे फीचर उपयुक्त ठरू शकतं. गुगल क्रोमच्या सेटिंग्जमध्ये गेल्यावर खालच्या बाजूला सेव्ह डाटा हा ऑप्शन दिसेल. हा ऑप्शन ऑन करा. यामुळे ब्राउसिंगही झटपट करता येईल.

## थर्मामीटर बनवा घरच्या घरी

करून तर पाहा

**आ**पल्याला ताप आला की नेमकं प्रमाण मोजण्यासाठी थर्मामीटरचा वापर केला जातो. थर्मामीटर बाहेरून आणलं जातं. तुम्ही घरच्या घरीही ते तयार करू शकता.

**साहित्य :** चिकण माती, खायचा लाल रंग, पाणी, स्ट्रॉ, रबिंग अल्कोहोल, प्लास्टिकची छोटी बाटली, थर्मामीटर (पर्यायी)

**कृती:** पाणी आणि अल्कोहोल सम प्रमाणात घेऊन पाव बाटली भरून घ्या. यात लाल रंग घाला.



हलवून घ्या. आता या बाटतील स्ट्रॉ ठेवा. बाटलीच्या तोंडाजवळ तसंच स्ट्रॉच्या वरच्या बाजूला चिकण माती लावा. यामुळे स्ट्रॉ हलणार नाही. स्ट्रॉ बाटलीबाहेर येऊ द्या. चिकण मातीने बाटलीचं तोंड बंद करा. स्ट्रॉसुद्धा नीट बसायला हवा पण स्ट्रॉचं वरचं तोंड उघडं ठेवा. आता प्रयोग करा. बाटलीला बाहेरून हात लावा. बाटलीला गरम हात लागल्यावर काय होतं, हे बघा. यात नेमकं होतं काय तर अल्कोहोल आणि पाण्याचं मिश्रण गरम झालं की उसळतं आणि पाणी स्ट्रॉच्या वरच्या बाजूला येतं. ते स्ट्रॉच्या अगदी वरपर्यंत येण्यासाठी पाण्याला किती उष्णता मिळायला हवी, हे तुम्हीच ठरवा. पाणी पोहोचलेल्या भागावर छोटी खूण करा. आता दुकानातून आणलेल्या थर्मामीटरच्या मदतीने स्ट्रॉमधल्या पाण्याचं तापमान मोजा. घरातल्या थंड आणि गरम भागात जाऊन तुम्ही हा प्रयोग करू शकता.



## स्वप्ने का आणि कशी पडतात ?

रंजक विज्ञान

**आ**पण शांतपणे झोपलेलो असतो. डोळे बंद असतात. शरीर हालचाल करत नसते. तरीही आपल्या मनात चित्रे दिसतात. आवाज ऐकू येतात. कधी आपण उडतो. कधी पळतो. कधी घाबरून जागे होतो. जागे झाल्यावर लक्षात येते, की हे तर स्वप्न होते.

आपण झोपलो की आपले शरीर विश्रांती घेते. पण मेंदू पूर्णपणे झोपत नाही. मेंदूचा एक भाग सतत काम करत असतो. दिवसभर आपण जे पाहतो, ऐकतो, शिकतो, अनुभवतो ते सगळे मेंदूत साठवून ठेवले जाते. झोपेत मेंदू ही सगळी माहिती नीट लावण्याचे काम करतो. खोली आवरताना आपण खेळणी एकत्र ठेवतो, पुस्तके एका कप्प्यात ठेवतो, तसेच मेंदू आठवणी नीट रचून ठेवतो. या आठवणी रचताना कधी कधी वेगवेगळ्या गोष्टी एकमेकांमध्ये मिसळतात आणि त्यातून स्वप्ने तयार होतात. म्हणूनच ही स्वप्ने कधी खूप मजेशीर, कधी विचित्र, तर कधी थोडी भीतीदायक असतात. उदाहरणार्थ, शाळेत झालेली परीक्षा, पाहिलेला चित्रपट, आई–बाबांनी सांगितलेली गोष्ट किंवा एखादी भीती हे सगळे स्वप्नात एकत्र येऊ शकते.



स्वप्न पडताना शरीर हालचाल करत नाही. कारण निसर्गाने तशी खास व्यवस्था केलेली आहे. नाहीतर आपण स्वप्नात धावलो, तर खरेच धावायला लागलो असतो ना! त्यामुळे शरीर शांत राहाते आणि फक्त मन तेवढे स्वप्नात फिरत असते.

काही स्वप्ने आनंदी असतात. तर काही वाईट आणि दु:खी असतात. वाईट स्वप्न पडणेही चुकीचे नाही. आपला मेंदू अशा स्वप्नांच्या मार्गाने भीती, ताण किंवा काळजी कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. म्हणूनच लहान मुलांना अंधाराची, एकटेपणाची किंवा मोठ्या आवाजाची स्वप्ने जास्त पडतात.स्वप्न म्हणजे मेंदूची भाषा आहे. ती आपल्याला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत असते. म्हणून स्वप्न म्हणजे आजार किंवा जादू नाही. ते आपल्या हुशार मेंदूचे काम आहे. झोप नीट झाली,मन शांत ठेवले तर पडणारी स्वप्नेसुद्धा छान आणि प्रसन्न असतात.

## शिवालिक पर्वतरांगा

पर्वतरांगा

**शि**वालिक पर्वतरांग हा हिमालय पर्वतरांगेचा सर्वात बाहेरील आणि कमी उंचीचा भाग आहे. शिवालिक म्हणजे डोंगरांच्या पायथ्याशी असलेली रांग. ही पर्वतरांग जम्मू–काश्मीरपासून सुरू होऊन हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि आसाम पर्यंत पसरलेली आहे. ही पर्वतरांग माती, वाळू, गोटे आणि दगडांच्या थरांनी तयार झालेली आहे. त्यामुळे ती इतर हिमालयीन भागांच्या तुलनेत नाजूक आहे. त्यामुळेच येथे भूस्खलन होण्याची शक्यता अधिक असते. या भागातील शिखरांची उंची साधारण ६०० ते १५०० मीटरच्या दरम्यान आहे. चंद्रभागा टेकडी, नाहन परिसरातील टेकड्या आणि आसामकडील पठारी भाग तुलनेने उंच आहेत.

शिवालिक पर्वतरांगेत काही ठिकाणी चुना दगड, क्वार्ट्झ, फेल्स्पार यासारखी खनिजे सापडतात. ही खनिजे काच उद्योग, सिरॅमिक आणि बांधकामासाठी वापरली जातात. या पर्वतरांगेतून घग्गर, मारकंडा, टॉन्स, कोसी यासारख्या अनेक लहान नद्या आणि ओढे उगम पावतात. त्यांना स्थानिक भाषेत चोअ किंवा खड असे म्हणतात. पावसाळ्यात या नद्या प्रचंड वेगाने वाहतात. तर उन्हाळ्यात अनेकदा कोरड्या पडतात. या नद्यांमुळे आसपासच्या शेतीला पाणी मिळते. येथील दाट जंगलांमध्ये साल, खैर, शिसव, साग, बांबू, गवताची जंगले मोठ्या प्रमाणात आहेत. ही जंगले मातीची धूप रोखण्यास मदत करतात. या भागात गुजर, थारू आणि काही ठिकाणी गोंडसदृश आदिवासी समुदाय राहतात. हे लोक पशुपालन, शेती आणि जंगलावर आधारित जीवन जगतात. या पर्वतरांगेतील जंगलांमध्ये हत्ती, वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, सांबर, नीलगाय, रानडुक्कर असे अनेक प्राणी तसेच मोर, तीतर, ससाणा, गरुड, घुबड, रानकोंबडा यांसारखे पक्षी आढळतात.



शिवालिक पर्वतरांग भूगर्भशास्त्रीय दृष्ट्या नवीन व नाजूक असल्यामुळे येथे खाणकाम करणे धोकादायक मानले जाते. येथे चालू असलेल्या अति खाणकामामुळे भूस्खलन, जंगल नाश आणि पाण्याच्या स्त्रोतांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे इथल्या खनिज संपत्तीचा वापर करताना पर्यावरणाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे.

## वैशिष्ट्यपूर्ण अभ्रक

माहिती खनिजांची

**अ**भ्रक हे एक चमकदार पारदर्शक आणि पातळ पापुद्रे असलेले खडकात सापडणारे खनिज आहे. अभ्रकाचे सर्वाधिक उत्पादन भारतात होते. अभ्रकाच्या खाणी प्रामुख्याने झारखंड आणि बिहारमध्ये आहेत. आंध्र प्रदेश, राजस्थान आणि तेलंगणा ही राज्ये अभ्रक उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. याशिवाय मध्य प्रदेश आणि ओडिशामध्येही काही प्रमाणात अभ्रक आढळतो. अभ्रकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते उष्णता सहन करू शकते. त्यातून वीज प्रवाहित होत नाही. अभ्रक सहजपणे तुटत नाही. अभ्रक प्रामुख्याने आग्नेय आणि रूपांतरित खडकांमध्ये आढळते. काही ठिकाणी जमिनीवरच अभ्रकाचे थर दिसतात. तर काही ठिकाणी खाणीत खोलवर जावे लागते. खाणीतून मोठे खडक काढले जातात आणि त्यामधून अभ्रक वेगळे केले जाते. नंतर अभ्रकाचे मोठे तुकडे हाताने किंवा यंत्रांच्या साहाय्याने पातळ पत्रकांमध्ये विभागले जातात.



काही अभ्रक बारीक पूड स्वरूपातही तयार केला जातो. अभ्रकाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील मस्कोवाइट आणि बायोटाइट हे प्रकार जास्त प्रसिद्ध आहेत. मस्कोवाइट रंगाने फिकट किंवा पारदर्शक असतो. बायोटाइट गडद रंगाचा असतो. वीज उपकरणांमध्ये अभ्रकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. हीटर, इस्त्री, इलेक्ट्रिक मोटर, ट्रान्सफॉर्मर यामध्ये अभ्रक वापरला जातो. बांधकाम क्षेत्रात अभ्रकाचा उपयोग उष्णता व आवाज रोखण्यासाठी केला जातो. रंग, सौंदर्य प्रसाधने, औषधे, रबर, प्लास्टिक आणि कागद उद्योगात अभ्रकाची पूड वापरली जाते.पूर्वी स्वयंपाकाच्या चुली, दिवे आणि खिडक्यांमध्येही अभ्रकाचा वापर होत असे. आज पर्यावरण आणि आरोग्याच्या दृष्टीने त्याच्या वापरावर काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. अर्थातच योग्य वापर केल्यास अभ्रक हे अतिशय उपयुक्त खनिज आहे.

विनायक दळवी

# पाकिस्तानी खेळाडूंची गुंतवणूक घेऊन उद्योगपती पसार !

## अधिक लाभाची लालूच भोवली



बांगलादेश आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) यांच्यातील वाद रंगला असतानाच इकडे पाकिस्तानातून एक सनसनाटी बातमी प्रसिद्ध झाली आहे. अधिक पैशाच्या लालसेने, एका पाकिस्तानी व्यावसायिक उद्योगपतीकडे पैसे गुंतवणाऱ्या अनेक बड्या पाकिस्तानी खेळाडूंना गुंगारा देऊन ही कंपनीच आता गायब झाली आहे.

पाकिस्तानचा स्टार खेळाडू बाबर आझम, टी-२० संघाचा कर्णधार सलमान अली आघा, यष्टीरक्षक मोहम्मद रिझवान, शादाब खान, शाहीन शाह आफ्रिदी, फखर जमान, हसन अली, मोहम्मद हसनैन, ओसामा मीर, तय्यब ताहिर आणि आसिफ अली यांचा फसवणूक झालेल्या खेळाडूंमध्ये समावेश आहे.

पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि माजी निवडकर्ता इंझमाम-उल-हक यांना सर्वाधिक नुकसान सहन करावे लागले आहे. या इंजमामने अंदाजे ३.२१ दशलक्ष (९०० दशलक्ष पाकिस्तानी रुपये) गमावल्याचे वृत्त आहे. त्याच्या स्वतःच्या बचतीव्यतिरिक्त, त्याने त्याच्या मित्रांनाही या फसव्या योजनेत गुंतवणूक करण्यास सांगितले होते.आता ते सर्व जण रडताना दिसत आहेत. बहुतेक खेळाडूंच्या आयुष्यातील बचत, गुंतवणूक योजनेच्या नावाखाली घेऊन ही कंपनी फरार झाली आहे. जास्त नफ्याच्या आमिषाने एका पाकिस्तानी व्यावसायिकाने बहुतेक पाकिस्तानी खेळाडूंचे पैसे त्याच्या कंपनीत गुंतवले होते.

सुरुवातीला, ते काही काळ चांगला नफा मिळवत राहिले, परंतु नंतर, व्यावसायिकाने कंपनीत तोटा दाखवून त्यांना नफ्याची रक्कम देण्यास नकार दिला.केवळ नफाच नाही तर खेळाडू आता त्यांच्या मूळ रकमेबद्दलही चिंतेत आहेत. कारण तो व्यापारी गायब झाला आहे. तो खेळाडूंच्या फोनला उत्तर देत नाही. खेळाडूंना त्याचा ठावठिकाणाही माहिती नाही. याच व्यावसायिकाच्या कंपनीने पीएसएल संघांनाही प्रायोजित केले होते. संघ मालकांना अद्याप त्यांचे पैसे मिळालेले नाहीत. संघ मालक आता पीसीबीशी मध्यस्थी करून त्यांचे पैसे परत मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत.

पाकिस्तानी खेळाडूंनी पीसीबी अध्यक्ष नक्वी यांना आवाहन केले आहे की त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे आणि फसव्या कंपनीच्या मालकाला लवकरात लवकर अटक करून त्यांचे पैसे परत मिळवून द्यावेत.

# बांगलादेशचा भारतात खेळण्यास नकार

## || कोलकाता, मुंबईत होत्या लढती || विश्वचषकासाठी फक्त १५ दिवस शिल्लक



| ढाका | वृत्तसंस्था |

भारतात टी-२० विश्वचषकाचे सामने खेळण्यासाठी न येण्याच्या निर्णयावर बांगलादेश क्रिकेट मंडळ (बीसीबी) ठाम आहे. त्यामुळे आता यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद काय उत्तर देणार याकडे लक्ष लागून आहे. बांगलादेशची स्पर्धेतून गच्छंती केली जाण्याची शक्यता असून स्कॉटलंडला स्पर्धेत प्रवेश दिला जाऊ शकतो.

भारत व श्रीलंका येथे ७ फेब्रुवारीपासून टी-२० विश्वचषकाचे आयोजन करण्यात येणार आहे. मात्र हिंदू नागरिकांवर बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या अत्याचारांमुळे बांगलादेशचा क्रिकेटपटू मुस्तफिझूर रहमानला बीसीसीआयने आयपीएलमध्ये खेळण्यास विरोध केला. त्या प्रत्युत्तरात बांगलादेशने विश्वचषकासाठी भारतात येण्यास नकार दिला. तसेच बांगलादेशचा स्पर्धेतील गट बदलण्यात यावा, अशीही मागणी केली. आयसीसीने बांगलादेशची मागणी फेटाळून लावली असून त्यांना भारतात कोणताही धोका नसल्याचे सांगितले.

आयसीसीने बांगलादेशला विचार करण्यासाठी २२ जानेवारीपर्यंतची मुदत दिली होती. मात्र बीसीबी आपल्या निर्णयावर ठाम आहे. त्यांनी आपल्या लढती श्रीलंकेत खेळवण्याचा प्रस्ताव आयसीसीपुढे ठेवला आहे. त्यामुळे आता आयसीसी बांगलादेशवर कारवाई करून त्यांना विश्वचषकातून काढणार, असेच दिसते आहे. स्कॉटलंड या स्पर्धेसाठी पात्र ठरण्याची शक्यता आहे. आमच्या संघातील खेळाडू विश्वचषकासाठी मेहनत घेत आहेत. मात्र त्यांच्या सुरक्षेची काळजी घेणे आमचे कर्तव्य आहे. तसेच विश्वचषकानिमित्त बांगलादेशमधील पत्रकार, प्रेक्षकही भारतात जातील. त्यांना तेथे धोका उद्भवू शकतो. अशा स्थितीत आम्ही बांगलादेशचा संघ भारतात लढती खेळण्यासाठी न पाठवण्यावर ठाम आहोत, असे बीसीबीचे क्रीडा सल्लागार आसिफ नुझरुल म्हणाले.

बीसीसीच्या पदाधिकाऱ्यांची गुरुवारी बैठक झाली. त्यामध्ये यासंबंधी पुन्हा चर्चा करण्यात आली. यावेळी बांगलादेश संघातील तांझिद हसन, नजमूल शांतो, जेकर अली, शमिम होसेन हे खेळाडू उपस्थित होते.

बांगलादेशचा संघ विश्वचषकासाठी क-गटात आहे. त्यांना इंग्लंड, इटली, वेस्ट इंडिज व नेपाळ यांच्याविरुद्ध साखळी सामने खेळायचे आहेत. बांगलादेशच्या दोन लढती कोलकातामध्ये, तर एक सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. तसेच मुस्तफिझूरला आयपीएलमधून बाहेर करत बीसीसीआयने खेळात राजकारण आणले आहे, अशी तक्रारही बीसीबीने आयसीसीकडे केली आहे. आयसीसी यावर पुढील काही दिवसांत निर्णय घेणे अपेक्षित आहे. कारण आता विश्वचषकासाठी फक्त १५ दिवस शिल्लक आहेत.

### पाकिस्तानचा बांगलादेशला पाठिंबा

**पाकिस्तान क्रिकेट मंडळाने बांगलादेशला पाठिंबा दर्शवला आहे. बांगलादेशचे सामने पाकिस्तानमध्ये आयोजित करण्यासाठी आपण तयार असल्याचे पाकिस्तानचे म्हणणे आहे. मात्र आयसीसी त्यासाठी परवानगी देण्याची शक्यता कमीच आहे. यापूर्वी चॅम्पियन्स ट्रॉफीत भारताचे सामने दुबईत झाले होते. तसेच पाकिस्तानचा महिला संघही विश्वचषकासाठी भारतात आला नव्हता. २०२७ पर्यंत भारत-पाकिस्तानमध्ये हा करार कायम असेल.**

# मॅरेथॉनमध्ये कार्तिक, संजीवनीची सुवर्ण कामगिरी



| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्राच्या धावपटूंनी मुंबई मॅरेथॉनमध्ये ठसा उमटवला. एकीकडे मुंबईमधील बोरिवली येथील कार्तिक करकेरा याने पूर्ण मॅरेथॉन पुरुष विभागात विजेता होण्याचा मान संपादन केला, तर दुसरीकडे नाशिकच्या संजीवनी जाधव हिने पूर्ण मॅरेथॉन महिला विभागात जेतेपदावर मोहर उमटवली आहे.

नाशिक येथील एकलव्य अकादमीचे प्रशिक्षक विजेंदर सिंह यांच्या मार्गदर्शनात हे दोनही खेळाडू कसब आत्मसात करीत आहेत, हे विशेष. दोन्ही खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावताना नेत्रदीपक कामगिरी करून दाखवली आहे.

पुरुष विभागातील पूर्ण मॅरेथॉनमध्ये कार्तिक करकेरा याने दोन तास १९ मिनिटे व ५५ सेकंद अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली व पहिल्या स्थानावर झेप घेतली. आंतरराष्ट्रीय एलिट विभागात तो दहाव्या स्थानावर राहिला. याच विभागात अनिश मगर याने दोन तास २० मिनिटे आठ सेकंदांसह शर्यत पूर्ण करताना रौप्यपदकाची कमाई केली.

प्रदीप चौधरी याने दोन तास २० मिनिटे ४९ सेकंदांसह ब्राँझपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली.

महिला विभागातील पूर्ण मॅरेथॉनमध्ये संजीवनी जाधव हिने दोन तास, ४९ मिनिटे व दोन सेकंदांत शर्यत पूर्ण करताना सुवर्णपदकावर नाव कोरले. निर्माबेन ठाकूर हिचे सलग तिसऱ्यांदा मुंबई मॅरेथॉनमध्ये अजिंक्य होण्याचे स्वप्न अधुरेच राहिले. तिने दोन तास ४८ मिनिटे १३ सेकंदांत शर्यत पूर्ण केली; पण तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

सोनम हिने दोन तास ४९ मिनिटे २४ सेकंदांत शर्यत पूर्ण करीत रौप्यपदक जिंकले.कार्तिक करकेरा याने मागील मुंबई अर्ध मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला होता.

यंदा तो पहिल्यांदाच मुंबईतील पूर्ण मॅरेथॉनमध्ये सहभागी झाला होता. पहिल्याच प्रयत्नात त्याला घवघवीत यश संपादन करता आले. संजीवनी जाधव हिनेही पहिल्यांदाच मुंबई पूर्ण मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला होता. तिलाही दैदीप्यमान कामगिरी करता आली.

# आईस हॉकी संघाच्या निवडीला स्थगिती



| मुंबई | प्रतिनिधी|

आगामी खेलो इंडिया विंटर गेम्समधील आईस हॉकीकरता सुरू असलेल्या राज्य स्तरीय निवड प्रक्रियेला शनिवारी मुंबई उच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. आईस रिंग स्केट्सच्या सहाय्याने निवड करण्याऐवजी चक्क सीमेंट टर्फवर रोलर स्केट्स घालून आईस हॉकी खेळायला लावत खेळाडूंची निवड करण्याचा अजब कारभार सुरू असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मुळात हा खेळ बंदिस्त स्टेडियममध्ये नियंत्रित तापमानात खेळवला जातो. त्यामुळे याकरता लागणारे स्टेडियम उपलब्ध करून देणे आणि त्याची देखभाल करणे खर्चिक काम आहे. मात्र यावर तोडगा म्हणून राज्य क्रीडा संचलनालयानं काढलेल्या अजब उपायांवर आश्चर्य व्यक्त करत मुंबई उच्च न्यायालयाने बालेवाडीतील राज्यस्तरीय निवड प्रक्रियेलाच स्थगिती दिली आहे.

# स्केटींगमध्ये नवी मुंबईचे खेळाडू चमकले



**पुणे :** पुण्यात रुलर गेम ऑफ इंडियाच्या वतीने सुरू असलेल्या नॅशनल रोलर स्केटींग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये नवी मुंबईतील टीम एक्स्ट्रीमच्या खेळाडूंनी लक्षणीय कामगिरी करत पहिल्या दिवशी तब्बल ६ पदकांवर आपले नाव कोरले. पुणे येथील एलएक्सटी राहुल राणे स्केटिंग बॅण्ड ट्रॅकवर १७ आणि १८ जानेवारी २०२६ रोजी १३वी नॅशनल रोलर स्केटींग चॅम्पियनशिप स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत अनन्या माळी २ रौप्यपदक स्वरूप सोनवणे १ रौप्य आणि १ कांस्यपदक आणि पृथ्वी भावना राजेश २ कांस्यपदक पटकवित यांनी उल्लेखनीय कामागिरी केली. प्रत्येकाने महाराष्ट्रासाठी दुहेरी पथकांची कमाई केली आहे. करण सरदार यांनी या सर्व खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे. करण सरदार हे स्वतः राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईमध्ये टीम एक्स्ट्रीम या क्लबमध्ये १०० पेक्षा अधिक खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत.

# महाराष्ट्राचा महिला कबड्डी संघ जाहीर

| मुंबई | प्रतिनिधी |

७२ व्या महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा संघाच्या राज्य संघटनेच्या प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तीकर यांच्या मान्यतेने व मार्गदर्शना खाली जाहीर करण्यात आला आहे. पुणे ग्रामीणच्या रेखा सावंतकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा, तर मुंबई उपनगर पश्चिमच्या कोमल देवकरकडे उप कर्णधारपद सोपविण्यात आले.



तेलंगणा येथे गच्ची बोवली बंदिस्त क्रीडा संकुल येथे २७ ते ३० जानेवारी कालावधीत ही स्पर्धा होईल. मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशन व स्वस्तिक क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली पूर्व येथील सुवर्णा संतोष केणे गार्डन, आयरे रोड येथे या संघाचे सराव शिबिर प्रशिक्षिका मेघाली म्हसकर (कोरगावकर) यांच्या मार्गदर्शना खाली सुरू आहे. फिजिओ म्हणून सलोनी संकपाळ यांची, फिटनेस ट्रेनर म्हणून सायली नागवेकर हिची नियुक्ती करण्यात आली आहे. या संघाच्या निवडीत पारदर्शकता यावी म्हणून या निवडीचे थेट प्रक्षेपण करण्यात येऊन ते कबड्डी रसिकांना दाखविण्यात आले. मीनल पालांडे, वीणा शेलटकर, मेघाली कोरगावकर यांच्या निवड समितीने या संघाची निवड केली. या तिन्ही सदस्य शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू आहेत. हा संघ दिनांक २६ जानेवारी रोजी पहाटे तपोवन एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना होईल.

संघ खालील प्रमाणे. १) रेखा सावंत (कर्णधार) पुणे ग्रामीण, २) कोमल देवकर (उपकर्णधार) पश्चिम, ३) प्रतीक्षा तांडेल ४) समृद्धी मोहिते, ५) पौर्णिमा जेधे, ६) ज्युली मिस्किटा, ७) साक्षी सावंत, ८) समरिन बुरोंडकर,९) गार्गी साखरे १०) आम्रपाली गलांडे, ११) निकिता पडवळ १२) याशिका पुजारी उपनगर पूर्व, १३) माधुरी गवंडी १४) संजना भोईर, राखीव खेळाडू - १) हर्षा शेट्टी २) तसलिन बुरोंडकर ३) अंकिता चव्हाण, प्रशिक्षिका-मेघाली म्हसकर यांचा समावेश आहे.

# बुद्धिबळात बाळकृष्ण पेडणेकर अव्वल

**सावंतवाडी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सिंधुदुर्ग यांनी आयोजित केलेल्या सिंधुशौर्य जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत मुक्ताई अकॅडमीचा बाळकृष्ण पेडणेकर पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरला. स्क्रीन टाईम ते क्टिविटी टाईम या उपक्रमांतर्गत कुडाळ येथील संत राऊळ महाराज महाविद्यालयात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत जिल्ह्यातील २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्या डॉ. स्मिता सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुक्ताई अकॅडमीचे अध्यक्ष कौस्तुभ पेडणेकर, दिग्विजय पवार, वरद प्रभू आदी मान्यवर उपस्थित होते. पारितोषिक वितरण दिग्विजय पवार, कौस्तुभ पेडणेकर, राजेंद्र तवटे, अथर्व श्रृंगारे, वरद प्रभू आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# भारताचा आफ्रिका दौरा जाहीर



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. आगामी टी-२० विश्वचषकापूर्वी भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार आहे.

क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने मंगळवारी अधिकृतपणे जाहीर केले की, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाईल. ही मालिका १७ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.

ही मालिका दक्षिण आफ्रिकेतील तीन प्रमुख शहरांमध्ये खेळवली जाणार आहे. मालिकेची सुरुवात डर्बनमधील ऐतिहासिक किंग्जमीड स्टेडियमवर होईल. त्यानंतर जोहान्सबर्गमधील वॉन्डरर्स स्टेडियमवर दोन सामने खेळवले जातील आणि मालिकेचा शेवट बेनोनी येथे होणार आहे.

### मालिकेचे वेळापत्रक

पहिला टी-२०: १७ एप्रिल २०२६ - किंग्जमीड, डर्बन
दुसरा टी-२०: १९ एप्रिल २०२६ - किंग्जमीड, डर्बन
तिसरा टी-२०: २२ एप्रिल २०२६ - वॉन्डरर्स, जोहान्सबर्ग
चौथा टी-२०: २५ एप्रिल २०२६ - वॉन्डरर्स, जोहान्सबर्ग
पाचवा टी-२०: २७ एप्रिल २०२६ - विलोमूर पार्क, बेनोनी.

# पेण फोटोग्राफर्स संघ विजेता



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा फोटोग्राफर्स व व्हिडीओग्राफर्स असोसिएशनच्या वतीने कर्जत येथिल मैदानावर मर्यादीत षटकांच्या टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पेण फोटोग्राफर्स संघाने प्रथम क्रमांक मिळविला असून व्दितीय क्रमांक कर्जत फोटोग्राफर्स, तृतीय क्रमांक रोहा फोटोग्राफेर्स तर अलिबाग फोटोग्राफर्स संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत अष्टपैलू खेळ करून दाखवित पेण संघाच्या शैलेश पाटीलने मालिकावीर होण्याचा मान पटकाविला. अलिबाग संघाच्या राकेश शिर्के उत्कृष्ट फलदांजाचे पारितोषिक पटकाविले असून पेण संघाच्या विनोद बामुगडे याला उत्कृष्ट गोलंदाज आणि रोहा संघाचा दीपक मोरे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून गौरविण्यात आले.

सामन्यांचे उद्‌घाटन कर्जत नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा विद्यमान नगरसेविका सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विजय मांडे, हरिषभाई शहा, रायगड फोटोग्राफेर्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष उपस्थित होते.

या स्पर्धेत रायगड जिल्हातील अलिबाग, पेण, खोपोली, कर्जत, रोहे, नागोठणे आणि महाड संघानी सहभाग घेतला होता. कर्जत नगरपालिकेचे नगरसेवक संकेत भासे, अरुणा वायकर, जान्हवी देवघरे, संजय मोहिते, रायगड फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, सचिव आनंद निंबरे, सहसचिव दीपक बडगुजर, खजिनदार जितेंद्र मेहता, कार्यकारिणी सदस्य अविनाश राऊत, सुशील घाटवळ, कर्जत फोटोग्राफेर्स असोसिएशनचे अध्यक्ष योगेश कुंभार, प्रशांत गुरव,निलेश थोरवे, भरत भुरे, ओमकार दळवी, अजय गुंजाळ व सर्व सदस्य उपस्थिती होते. स्पर्धेचे कर्जत फोटोग्राफेर्स असोसिएशनने दिमाखदार नियोजन केले होते.

## सरफराज खानचे पुन्हा एकदा द्विशतक | भारतीय संघाचा पुन्हा ठोठावला दरवाजा

# रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईकराचा जलवा

| हैदराबाद | वृत्तसंस्था |

रणजी ट्रॉफीचे सामने आता सुरु झाले आहेत. विजय हजारे ट्रॉफी नुकतीच संपली. या स्पर्धेत विदर्भाने बाजी मारली. विदर्भाने पहिल्यांदाच विजय हजारे ट्रॉफी जिंकली. आता सगळे संघ पुन्हा एकदा रणजी जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. देशांतर्गत स्पर्धेत काही खेळाडू सतत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. तरीही भारतीय संघात खेळाडू स्थान मिळवू शकत नाही आहे. आता मुंबईच्या स्टार खेळाडूने सरफराज खानने सामन्यात पुन्हा एकदा शतक नाहीतर द्विशतक ठोकले आहे.



भारतीय संघाचा फलंदाज सरफराज सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी करत आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये शानदार कामगिरी केल्यानंतर, रणजी ट्रॉफी स्पर्धेत त्याचा सुवर्ण फॉर्म कायम आहे. रणजीत खेळताना त्याने शानदार द्विशतक झळकावले. सरफराजने हे द्विशतक २०२ चेंडूत पूर्ण केले. या सामन्यात त्याला त्रिशतक पूर्ण करण्याची संधी होती, परंतु तो ते करू शकला नाही. या खेळीसह त्याने भारतीय संघामध्ये पुनरागमनाचा दरवाजा ठोठावला आहे.

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात त्याने २०६ चेंडूत आपले द्विशतक पूर्ण केले. २१९ चेंडूत ९ षटकार आणि १९ चौकारांच्या मदतीने २२७ धावा करून तो अखेर बाद झाला. हे त्याचे १७ वे शतक आणि त्याच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील सहावे द्विशतक होते. सरफराजने ५० दिवसांत तिन्ही देशांतर्गत स्वरूपात शतके झळकावली आहेत. २ डिसेंबर रोजी त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये आसामविरुद्ध फक्त ४७ चेंडूत १०० धावा केल्या. ३१ डिसेंबर रोजी विजय हजारे ट्रॉफीमध्ये गोवाविरुद्ध ७५ चेंडूत १५७ धावा करून तो बाद झाला. आता, त्याने रणजी ट्रॉफीमध्ये द्विशतक झळकावले आहे.

### पाच धावांचा टप्पा पार

**सर्फराजने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५,००० धावांचा टप्पाही ओलांडला. आतापर्यंत, त्याने या फॉरमॅटमध्ये ६४.३ च्या सरासरीने धावा केल्या आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याचा स्ट्राइक रेट ७०.१० आहे. त्याने आता ६१ सामन्यांमध्ये ९१ डावात ४९ पेक्षा जास्त सरासरीने ५०९० धावा केल्या आहेत. आता, भारतीय संघात खेळत असलेल्या पुढील कसोटी मालिकेत सर्फराज खानला संधी मिळते याकडे लक्ष असेल.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)